Library

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणा-या विविध
घटनांचा 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY
५/१२/०८


३ ● गुंफण
७ ● जागतिकीकरण आणि लहान शेतकरी
१५ ● ... म्हणून विरोध खुल्या व्यापाराला !
२३ ● न्याय्यतेच्या दिशेने....
२९ ● जिकडेतिकडे (चळवळ विरोधाची)


## जागतिकीकरण विशेष

खंड ७ : अंक ९ डिसेंबर २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**<u>'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.</u>**

**<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :**
**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ७ (अंक ९) डिसेंबर २००८**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणा-या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# गुंफण

संपूर्ण जगच सध्या सैरभैर अवस्थेत आहे. 'जागतिकीकरण' या संकल्पनेची व्याख्या आता पुस्तकातून शिकण्याची आवश्यकता उरलेली नाही. अमेरिकेत फुटलेल्या 'सबप्राइम' फुग्याचा कानठळ्या बसवणारा आवाज देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांत उमटावा, या एका घटनेतच 'जागतिकीकरण' या संज्ञेचे सार सामावलेले आहे. 'जागतिकीकरण हवे की नको ?', हा प्रश्नही हल्ली कोणी विचारत नाही. एके काळी या विषयावर चर्चा-परिसंवादांची झोड उठत असे. या प्रश्नातील फोलपणा उमगल्यानंतर एक टप्पा असा येऊन गेला की, जागतिकीकरण जर टाळताच येणार नसेल तर त्याचा चेहरा तरी निदान मानवी असावा, हा सूर त्या काळात अनेकानेक व्यासपीठांवरून गुंजताना कानी पडे. आता, हा 'मानवी चेहरा' म्हणजे नेमका कसा चेहरा, याचे स्पष्टीकरण देण्याच्या भानगडीत तेव्हाही कोणी पडले नव्हते. जागतिक कीर्तीच्या अर्थतज्ज्ञांत गणना केल्या जाणा-या प्राध्यापक जगदीश भगवती यांनी तर, 'मुळात जागतिकीकरणाचा चेहरा हा मानवीच आहे', असे ठाम प्रतिपादन करून सगळी हवाच काढून घेतली होती ! जागतिकीकरणाचा आज तुम्हांआम्हांला अनुभवाला येत असलेला चेहरा मात्र चांगलाच उग्र आहे. तो मवाळ वा मायाळू केव्हा बनेल, ते सांगता येणार नाही. मुळात, 'जागतिकीकरण' या प्रक्रियेचा चेहरा कसा असतो, यांबाबत अगदी सुरुवातीलाही कोणालाच कल्पना नव्हती. सोव्हिएत संघराज्याचे विघटन १९९१ साली पूर्णत्वास गेले आणि त्याच्याच आगेमागे जागतिकीकरणाचे वारे जाणवण्याइतपत वेगाने सर्वसंचारी बनले. सर्वसाधारणपणे तेव्हा सर्वत्र सूर हा स्वागताचाच होता. आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारे मिळणा-या लाभांना जगभरातले देश तोवर सरावलेले होते. आता, जागतिकीकरणाच्या माध्यमातून देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांची परस्परांत गुंफण घडून आल्याने वस्तू व सेवांच्याच बरोबरीने भांडवल, माहिती, तंत्रज्ञान, श्रमशक्ती यांचाही मोकळाढाकळा संचार सुरू होईल, या विचाराने सगळ्यांनाच संतोष-समाधान होते. विशेषतः, तिस-या

*(पान क्रमांक ५ वर पाहावे)*

# वाचकांचा प्रतिसाद

'**भा**रतातील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष' ('अर्थबोधपत्रिका', नोव्हेंबर २००८) या विषयावरील प्रा. सुहास पळशीकर यांचे भाष्य अत्यंत अभ्यासपूर्ण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, जनसंघ-भाजप आणि डावी आघाडी हे तीन मोठे पक्ष होते. भाषावार राज्यरचना हे भारताच्या राजकारणात प्रादेशिक पक्षांचा उदय होण्याचे एक मोठे कारण होय. आमच्या घटनाकारांनी देशातील राज्यांची रचना करताना प्रादेशिक भाषा हे मूलभूत सूत्र मानल्याने जनता भाषावार विभागली गेली व देशाची एकसंधता भंग पावली. हीच राज्यरचना भाषावार न करता विभागवार केली गेली असती तर भारत देश आजच्यापेक्षा अधिक एकसंधतेकडे झुकलेला दिसला असता. दुसरे कारण असे की, राष्ट्रीय पक्षांच्या राज्यस्तरीय नेत्यांनी स्थानिक जनहिताकडे लक्ष दिले नाही. ग्रामीण विकास आणि औद्योगिकीकरण या दोन महत्त्वाच्या मुद्यांकडे राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांचे दुर्लक्ष झाले आणि त्यामुळे स्थानिक नेते तयार झाले व प्रादेशिक पक्ष उदयास आले. या प्रादेशिक पक्षांनी स्थानिक जनतेच्या हिताचा मुद्दा लावून धरत राष्ट्रीय पक्षांना आपली दखल घेण्यास भाग पाडले. राष्ट्रीय पक्षांच्या निष्क्रियतेमुळेच प्रादेशिक पक्षांना राजकारण करण्याची संधी मिळाली. उत्तर प्रदेश व बिहार येथे अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता होती. गेल्या ६१ वर्षांत एकाही राष्ट्रीय पक्षाला या राज्यांचा विकास साधता आलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. शिक्षण नाही, औद्योगिक विकास नाही आणि नोक-यांच्या संधी नाहीत, अशा परिस्थितीत या दोन प्रांतांतील नागरिक उदरनिर्वाहासाठी दुस-या राज्यांत गेले. मग त्या राज्यातील भूमिपुत्रांच्या हिताचे संरक्षण करण्याची हाकाटी देत तिथे प्रादेशिक पक्ष निर्माण झाले. मराठी माणसाचा मुद्दा उचलून धरत शिवसेना पुढे आली. मात्र, पुढे हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन त्यांनी राष्ट्रीय राजकारणाची स्वप्ने बघितली आणि मराठी माणसाचा मुद्दा मागे ठेवला. त्यामुळे पुन्हा एकदा मराठीचा मुद्दा उचलून धरत आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा उदय झाला. आजच्या राष्ट्रीय पक्षांनी आपले स्वार्थकारण बाजूला ठेवून निर्भेळ समाजकारण करून सुरुवातीला राज्यहित व त्या नंतर राष्ट्रहित साधले तरच त्यांना प्रादेशिक पक्षांशी सामना देता येईल. अन्यथा, प्रादेशिक पक्षांबरोबरच्या आघाडी-युतीखेरीज त्यांच्यापुढे पर्याय नाही.

**सुधीर ब. देशपांडे, विलेपार्ले पूर्व, मुंबई**

*(पान क्रमांक ३ वरून)*

जगातील विकसनशील देशांच्या आशा तर फारच पल्लवीत झाल्या. कारण, भांडवलाचा तुटवडा पाचवीलाच पुजलेला असल्याने, उद्या भांडवल आणि गुंतवणुकीचे प्रवाह जगभरच खुलेपणाने वाहू लागले तर त्याचे काही ओघ तरी आपला दारवंटा ओलांडतील या आशेने, जागतिकीकरणाबाबतच्या त्यांच्या प्रारंभीच्या साशंकतेची जागा यथावकाश स्वागतशीलतेने घेतली. या उदारीकरणाचे देशोदेशीच्या अर्थव्यवहारांवर घडून आलेले अथवा येत असलेले परिणाम एकसारखे नसावेत, हे ओघानेच येते. देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांची जडणघडण, त्यांची सबल-शबल स्थाने, त्या त्या देशांची संस्कृती, राज्यव्यवस्था, प्रशासनाची गुणवत्ता, राजकीय नेतृत्वाचा कस अशा अनेकानेक घटकांवर या गुंफणीचे परिणाम अवलंबून असल्याचे चित्र आजवरच्या प्रवासात वारंवार सामोरे आलेले आहे. त्यामुळेच, जागतिकीकरण हे चांगले की वाईट, या प्रश्नाचे एकच एक, सरधोपट उत्तर जसे देता येत नाही, त्याचप्रमाणे, उदारीकरणासाठी ठिकठिकाणी उचलल्या गेलेल्या पावलांचे स्थानिक अर्थकारणामध्ये उमटलेले पडसादही एकसारखे असल्याचे दिसत नाही. त्यामुळे, कोणत्या प्रकारे घडवून आणलेले उदारीकरण हितकर आणि कोणते अहितकारी यांबाबतचेही ठोस, सार्वकालिक ठोकताळे मांडता येत नाहीत. साहजिकच, या संदर्भात जागतिक अनुभवावरून काही शिकण्या-सवरण्यासही मर्यादा पडतात. कारण, दोन अर्थव्यवस्थांचा तोंडवळा वरकरणी ब-यापैकी सारखाच दिसत असला तरी उदारीकरणाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी उचललेल्या सर्वसाधारणपणे एकाच प्रकारच्या पावलांना त्या दोन अर्थव्यवस्थांमधील आर्थिक घटकांकडून मिळणारा प्रतिसाद हा एकसारखाच असेल, याची हमी देता येणे अवघड असते. त्यातूनच, अनेक प्रकारचे प्रश्न आणि त्या प्रश्नांच्या मागोमाग आव्हाने निर्माण होतात. जागतिकीकरणामुळे अनेक अर्थव्यवस्थांना नाना प्रकारच्या संकटांचा सामना करावा लागत असल्याबाबत जो आवाज उठविला जातो, त्याचे मूळ इथे आहे. देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांमधील वाढत्या विषमतांबाबत केले जाणारे प्रतिपादन, हे याचे केवळ एक वानगीदाखल उदाहरण. इथे एक गोष्ट आपण सगळ्यांनीच ध्यानात घ्यावयास हवी की, काही प्रकारच्या

विषमतांचा उगम ज्याप्रमाणे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये संभवतो त्याचप्रमाणे, मुळातच एखाद्या अर्थव्यवस्थेत पूर्वापार जोपासल्या गेलेल्या विषमतांच्या जखमा उदारीकरणामुळे अधिकच ठुसठूसू लागणे, हेही तितकेच संभवनीय आहे. म्हणजेच, अर्थव्यवस्थेत अस्तित्वात असलेल्या अनेकविध दुखण्यांची जाणीव वा तीव्रता उदारीकरणामुळे अधिक सघन बनणे, हे स्वाभाविक ठरते. हेच तर्कशास्त्र गरिबी, बेरोजगारी, विभागीय असमतोल, पर्यावरणीय -हास, उद्योगांमधील आजारपण, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थेतील असंतुलने यांसारख्या यच्चयावत आर्थिक-सामाजिक व्याधींनाही लागू पडते. उदारीकरण आणि त्याच्या हातात हात गुंफून येणारे जागतिकीकरण, हे एकाच वेळी आव्हान आणि संधीही कसे ठरते याचे गमक इथे आहे. मुळातच अस्ताव्यस्त असलेले, कागदकपट्यांनी भरलेले आपले घर, त्याचे सगळे दरवाजे-खिडक्या उघडल्याबरोबर आतमध्ये रोरावत येणा-या हवेच्या झोतांमुळे अधिकच विस्कटून जाईल, या वास्तवाची निदान प्रचिती तरी आपल्याला दरवाजे-खिडक्या उघडण्याबाबतचा रेटा निर्माण झाल्यावर प्रकर्षाने होते. अन्यथा, 'आनंदी आनंद गडे' अशा सुखासीनतेमध्ये आपण मग्न असतोच. 'सबप्राइम'च्या धमाक्यामुळे जागतिकीकरणाच्या आजवरच्या प्रवासाची पुन्हा एकवार नव्याने चिकित्सा करण्याची प्रक्रिया सर्वत्रच सुरू व्हावी. म्हणूनच, या लाटेशी संबंधित काही मुद्यांचा नव्याने परामर्श घेणे अस्थानी ठरू नये. या कॅलेन्डर वर्षातील 'पत्रिके'चा हा अखेरचा अंक, अशा काही पैलूंच्या चर्चेलाच वाहिला आहे. हॅपी न्यू इयर ! ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# जागतिकीकरण आणि लहान शेतकरी

जागतिकीकरणाच्या वा-यांनी बव्हंशी जग व्यापल्याला आता जवळपास दोन दशके होत आली. ही प्रक्रिया अटळच असल्याची जाणीव झालेल्या देशोदेशीच्या सरकारांनी, हळूहळू, तिच्याशी मिळतेजुळते कसे घ्यावयाचे याबाबतचा विचारव्यूह सिद्ध करावयास सुरुवात केली. दुस-या शब्दांत सांगावयाचे तर, जागतिकीकरणाशी आपापल्या अर्थव्यवस्थांची नाळ जोडून देण्यासाठी उदारीकरणाबाबतचे नेमके कशा प्रकारचे धोरण अवलंबावे, या संदर्भात आजही देशोदेशी विचारविमर्श चालूच आहे. जागतिकीकरणाद्वारे चल बनलेले भांडवल, गुंतवणूक, मनुष्यबळ यांचा लाभ आपापल्या अर्थव्यवस्थांच्या मजबुतीकरणासाठी कशा प्रकारे उठवायचा, हा या सा-या विचारव्यूहाचा केंद्रबिंदू. अर्थव्यवस्थेतील कोणत्या क्षेत्रांचे दरवाजे किती प्रमाणात, कोणत्या क्रमाने आणि केव्हा व कसे उघडावयाचे, हा या ठिकाणी सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा ठरतो. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे व्यवस्थापन, यालाच म्हणतात.

आपल्या देशातही, उदारीकरणाचा पायरव १९९१ साली प्रथम ऐकू आला. तिथपासून सुरू झालेल्या सुधारणांना 'फर्स्ट जनरेशन रीफॉर्म्स्' असे आपण आजवर म्हणत आलो आहोत. आर्थिक पुनर्रचना वा सुधारणांच्या या पहिल्या टप्प्यात सारा भर राहिला आहे तो मुख्यतः औद्योगिक आणि वित्तीय क्षेत्रातील अनावश्यक बंधने-मर्यादा सैल करण्यावर वा उठवण्यावर. भारतीय शेतीक्षेत्राला मात्र अजूनही या सुधारणांचा वारा लागलेला नाही, अशी या क्षेत्रातील तज्ज्ञांची तक्रार आहे. किंबहुना, आजवर भारतात राबविल्या गेलेल्या सुधारणा कार्यक्रमाचे ते एक मोठेच वैगुण्य आहे, अशी टीकाही या संदर्भात केली जाते. सुधारणांच्या पुढच्या टप्प्यात (सेकंड जनरेशन रीफॉर्म्स्) आता शेतीकडे लक्ष दिले गेले पाहिजे, असेही या संदर्भात हिरीरीने बोलले जाते. परंतु, शेतीमध्ये आवश्यक असलेले हे 'रीफॉर्म्स्' नेमके कोणते व कसे असावेत, यांबाबत मात्र कोठेही फारशी चर्चा वगैरे होताना दिसत अथवा ऐकू येत नाही.

परंतु, आजवर जे काही आणि जसे काही उदारीकरण भारतात घडून आले आहे, त्याचे शेतीवर आणि शेतक-यांवर काय प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम घडून आले, हा

कुतूहलाचा मुद्दा ठरतोच. 'शेती' अथवा 'शेतकरी' अशी सर्वसमावेशक संज्ञा आपण जेव्हा वापरतो तेव्हा त्या सबगोलंकर सर्वसमावेशकतेमध्ये नानाविध सूक्ष्म तसेच स्थूल भेद गुंडाळले जातात. 'शेतकरी' हा एकच एक वर्ग आहे, असे चित्र त्यातून उभरते. वास्तवात ते तसे नसते. शेतजमिनीच्या मालकी क्षेत्रानुसार केले जाणारे लहान शेतकरी आणि मोठे शेतकरी, सिंचनाची हमी असणारे बागायतदार आणि केवळ मोसमी पावसावरच अवलंबून असलेले जिरायत वा कोरडवाहू शेतकरी, पारंपरिक पद्धतीनेच शेती करणारे आणि शेती कसण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करणारे, केवळ खाद्यान्न पिके घेणारे शेतकरी आणि नगदी पिके पिकविणारे शेतकरी....असे अनेकानेक पोटभेद वा श्लेष शेतकरी या सर्वसमावेशक संज्ञेमध्ये सामावलेले असतात. जागतिकीकरणाचे शेतक-यांवर काय परिणाम झाले, असा प्रश्न आपण विचारतो तेव्हा, शेतकरी वर्गाच्या उपरोक्त वर्गीकरणातील प्रत्येक घटकावर जागतिकीकरणाचे वेगवेगळे प्रभाव संभवतात, या वास्तवाकडे आपले लक्ष प्रकर्षाने वेधले जातेच असे नाही. कारण, उदारीकरणाचे आणि त्या पाठोपाठ अवतरणा-या जागतिकीकरणाचे लाभ पदरात पाडून घेण्याची, जागतिकीकरणाच्या आनुषंगिक नफ्यातोट्याला सामोरे जाण्याची प्रत्येक गटातील शेतक-यांची क्षमता ही वेगवेगळी असते आणि ती तशी वेगवेगळीच असणार, याचे पुरेपूर भान आपल्याला दर वेळी असतेच असे नाही.

**लहान शेतकरी केंद्रस्थानी**

जागतिकीकरणाच्या थेट वा-यांपासून आपल्या देशातील शेती आणि शेतकरी अजूनही बव्हंशी अ-स्पर्शितच राहिलेला असला तरी अन्य देशांतील परिस्थिती तशी नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे देशोदेशीच्या शेतीवर काय परिणाम घडून येत आहेत, आजवर कोणते परिणाम घडून आले आहेत यांबाबत विपुल संशोधन झाले आहे. आजही सुरू आहे. जागतिकीकरणामुळे, विशेषतः, लहान शेतक-यांवर कोणते प्रभाव पडतात, हा विषय या संपूर्ण अध्ययन-संशोधनात ब-यापैकी केंद्रस्थानी आहे. तो तसा असावा हे स्वाभाविकही ठरते. कारण, एकंदर जगभरातीलच शेती व्यवसायामध्ये या लहान शेतक-यांचे संख्यात्मक प्राबल्य आहे. लागवडीखाली असलेल्या क्षेत्रापैकी, सरासरीने, जगभरच सुमारे ८५ टक्क्यांच्या आसपास शेतकरी हे दोन हेक्टर वा त्यापेक्षा कमी जमीनधारणा असणारे सापडतात. बांगलादेशासारख्या देशात तर, सर्वसाधारणपणे पाऊण एकर क्षेत्र असणा-या जमीनधारकांचेच एकंदर शेतक-यांमध्ये संख्यात्मक प्राबल्य दिसते. भारताच्या बाबतीत बोलावयाचे म्हटले तर, दोन हेक्टर

अथवा त्यापेक्षा कमी जमीनधारणा असलेल्यांचा देशातील एकंदर अन्नधान्योत्पादनातील वाटा १९८०-८१ मध्ये ३४ टक्क्यांच्या आसपास होता. त्या नंतरच्या १० वर्षांत - म्हणजे १९९०-९१ साली तोच वाटा ४१ टक्क्यांपर्यंत उंचावलेला आढळतो. आफ्रिका खंडाचा सहारा वाळवंटानजिकचा टापू बघितला तर, त्या भागातील शेतीच्या एकूण उत्पादनामध्ये लहान व अल्प भूधारकांचा हिस्सा हा जवळपास ९० टक्क्यांचा आहे.

परंतु, या ठिकाणी एका गोष्टीचे भान ठेवणे आवश्यक आहे. 'लहान' वा 'अल्प भूधारक' शेतकरी यांसारख्या संज्ञांची सार्वत्रिक, सार्वकालिक अशी व्याख्या आढळत नाही. तशी व्याख्या करणे, हे शक्यही नाही. सर्वसाधारणपणे, जमीनधारक शेतक-याच्या मालकीच्या क्षेत्राचे आकारमान, अथवा, जमीनधारकाकडे असणा-या जनावरांच्या संख्येनुसार त्याला 'लहान' वा 'अल्प भूधारक' शेतकरी असे संबोधले जाते. मात्र, या निकषांच्या आधारे केले जाणारे वर्गीकरणही निर्दोष अजिबातच नाही. एकतर, जमीनधारणेनुसार एखादा शेतकरी 'लहान' आहे, असे जेव्हा त्याचे वर्णन केले जाते तेव्हा त्याचा संदर्भ त्या त्या भागातील सरासरी जमीनधारणेशी असतो. त्यामुळे, साहजिकच शेतकरी 'लहान' म्हणून घोषित होण्यासाठी निर्देशित केल्या जाणा-या क्षेत्राचे निकष विभागवार बदलत जातात. म्हणजेच, 'लहान शेतकरी' म्हणून काही शेतक-यांचे केले जाणारे वर्गीकरण हेही प्रांत वा विभागनिहाय बदलेल वा बदलते. दुसरे म्हणजे, जमीनधारणेनुसार शेतक-यांच्या केल्या जाणा-या वर्गीकरणामध्ये जमिनीच्या गुणवत्तेचा, कसाचा आणि पर्यायाने जमिनीच्या उत्पादकतेचा मुद्दा नजरेआडच होतो. यातच आणखी एक पैलू येतो तो म्हणजे सिंचनाचा. उदाहरणार्थ, पाच एकरांपेक्षा कमीच जमीनधारणा असलेला कोरडवाहू शेतकरी आणि जवळपास त्याच्याइतकीच जमीन असणारा परंतु, सिंचनाची हमी लाभलेला दुसरा लहान शेतकरी आम्ही एकाच तागडीत तोलणार का ?... हे सगळे पैलू ध्यानात घेऊनच, जागतिकीकरणाच्या लहान शेतक-यांवर होणा-या प्रत्यक्ष वा संभाव्य परिणामांबाबत आज ठिकठिकाणी संशोधन चालू आहे. कारण, एका बाजूने हा प्रश्न गरिबीच्या समस्येशीही गुंफला गेलेला आहे. दारिद्र्यरेषेची व्याख्याही पुन्हा सार्वत्रिक नसली तरी, ग्रामीण भागांतील गोरगरिबांमध्ये अल्प वा अत्यल्प भूधारकांचाच प्रामुख्याने भरणा असल्याचा अनुभव आजमितीस जगभरच येतो.

शेतकरी समूहावर जागतिकीकरणाद्वारे घडून येणारे परिणाम हे अनेक अंगांनी तपासावे लागतात. उदारीकरणाद्वारे जागतिक बाजारपेठेशी आपापल्या अर्थव्यवस्थांची

नाळ जोडून दिल्यानंतर शेतमालाच्या जागतिक बाजारपेठेतील किंमत बदलांचे स्थानिक बाजारपेठांतील शेतमालांच्या किंमतींवर काय परिणाम होतात, या बदलांना शेतकरी उत्पादन तसेच उपभोगाच्या संदर्भात कशा प्रकारचा प्रतिसाद देतात, या किंमतबदलांचा शेतक-यांचे उत्पन्न, ग्रामीण रोजंदारीचे दर तसेच पर्यायाने शेतीमधील गुंतवणूक व रोजगार निर्मितीवर काय परिणाम व ते केव्हा घडून येतात यांसारखे घटक बारकाईने तपासावे लागतात. आता तर, जागतिक व्यापार संघटनेचा अंमल सुरू झाल्यापासून या संपूर्ण वास्तवाला एक नवीनच परिमाण लाभले आहे. व्यापारसंलग्न बौद्धिक संपदा स्वामित्व अधिकारांसंदर्भातील जागतिक व्यापार संघटनेच्या विविध तरतुदींपायी शेतीसंबंधीच्या प्रगत प्रणाली, तंत्रशास्त्रे यांना असणारा शेतक-यांचा 'ॲक्सेस' बदलेल का, बदलणार असल्यास तो कशा प्रकारे बदलेल, बदलतो आहे; बौद्धिक संपदा स्वामित्व अधिकारांसंदर्भातील अटी-शर्तींपायी सुधारित बी-बियाणे, अवजारे, औषधे, कीटकनाशके यांच्या किंमतींमध्ये वाढ घडून आल्याने विशेषतः, लहान शेतक-यांना त्याचा फटका बसेल का... यांसारख्या पैलूंबाबत आज सर्वत्रच अभ्यास व संशोधन सुरू आहे. जागतिकीकरणापायी लहान शेतक-यांवर होणा-या थेट वा आनुषंगिक परिणामांबाबतचे या अभ्यासांमधून सामोरे येणारे चित्र हे व्यामिश्र स्वरूपाचे आहे.

**दोन गट, दोन मतप्रवाह**

उदारीकरणाद्वारे जागतिक बाजारपेठांशी जोडले जाण्याचे लहान शेतक-यांवर जे परिणाम संभवतात त्यांचे विश्लेषण करणा-यांमध्ये ढोबळ मानाने दोन गट अथवा दोन मतप्रवाह विद्यमान आहेत. उदारीकरणाद्वारे देशाचे शेतीक्षेत्र जागतिक अर्थव्यवस्थेशी गुंफले गेले की, शेतमालाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील बाजारभावांमध्ये घडून येणा-या चढउतारांचे शेतमालाच्या देशांतर्गत बाजारपेठांमध्ये जे पडसाद उमटतात आणि शेतीमध्ये पिकलेल्या जिनसांच्या किमतींवर त्याचे जे परिणाम होतात त्यावर मग सारे काही अवलंबून राहते. काही अभ्यासकांच्या प्रतिपादनानुसार, देशांतर्गत शेतमालाच्या बाजारपेठेची सांगड शेतमालाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी घातली गेल्याने त्या बाजारपेठेत ज्या जिनसांच्या किंमती एकंदरच सरासरीने चढ्या आहेत वा असतात अशा जिनसांच्या देशांतर्गत बाजारभावांची कमानही चढती बनेल. साहजिकच, संबंधित शेतमालाच्या उत्पादकांना या अशा चढ्या बाजारभावांचा लाभ मिळून त्यांच्या उत्पन्नावर त्याचे अनुकूल परिणाम घडून येतील. साहजिकच, अशा जिनसांचे उत्पादन घेण्यात जे लहान शेतकरी आघाडीवर आहेत अशांचे भवितव्य शेतीक्षेत्रातील उदारीकरणामुळे उजळून

निघेल. म्हणजेच, उदारीकरणाचे फायदे लहान शेतक-यांच्या पदरात पडतात किंवा नाही, यात त्या शेतक-यांची पीकपद्धती (क्रॉपिंग पॅटर्न) कळीची भूमिका बजावते. विशेषतः, फुले, फळफळावळ, मसाल्याचे पदार्थ यांसारख्या 'हाय व्हॅल्यू' उत्पादनांकडे वळणे लहान शेतक-यांना शक्य झाले तर शेतीमधील उदारीकरणाचे गोड लाभ त्यांच्या वाट्याला येऊ शकतील, असे या गटातील विश्लेषकांचे विश्लेषण आहे.

तर, दुस-या गटातील अभ्यासकांचे मत वेगळे आहे. मुळात, लहान शेतकरी हा स्वतःच्या कुटुंबाच्या वर्षभराच्या गरजेपुरते अन्नधान्य तरी आपल्या जमिनीतून पिकवू शकतो अथवा नाही, हा इथे केंद्रवर्ती मुद्दा ठरतो. उदारीकरणाद्वारे शेतमालाच्या - खास करून अन्नधान्याच्या - जागतिक बाजारपेठेशी अन्नधान्याच्या देशी बाजारपेठेची नाळ जोडली गेली असेल आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अन्नधान्यांचे भाव चढे असतील तर त्याचा परिणाम देशी बाजारपेठेतील अन्नधान्यांच्या सरासरी किंमती वाढण्यात घडून येणे हे सहज स्वाभाविकच ठरते. अशा वेळी लहान शेतक-यांची अवस्था मोठी बिकट बनते. समजा, कोरडवाहू भागातील एखाद्या लहान शेतक-याच्या जमिनीत त्याच्या कुटुंबाची जेमतेम सहा अथवा आठ महिन्यांचीच काय ती अन्नधान्याची गरज भागू शकेल इतकेच अन्नधान्य पिकत असेल, तर मात्र शेतीचे उदारीकरण त्याच्या हलाखीत भरच घालते, असा अभ्यासकांचा अभ्यास सांगतो.

याचे कारण उघड आणि सोपे आहे. स्वतःच्या जमिनीमधून स्वतःच्या कुटुंबाची वर्षभराची अन्नधान्याची गरजही भागवू न शकणारा लहान शेतकरी हा अन्नधान्याचा उत्पादक असतो खरा, पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तो अन्नधान्याचा नक्त खरेदीदार वा उपभोक्ता असतो. कारण, घरच्याघरी पिकलेले धान्य सहा वा आठ महिन्यांनंतर संपून गेले की, सुगीच्या पुढील हंगामापर्यंत त्याला अन्नधान्याची कुटुंबाची गरज ही खुल्या बाजारातून धान्य विकत घेऊनच भागवावी लागते. उदारीकरणामुळे अन्नधान्याच्या बाजारभावांची सरासरी किंमतपातळी चढती राहिली तरी एक उत्पादक म्हणून त्याचा त्याला काहीच फायदा नसतो. कारण, या चढ्या बाजारभावांना विकण्याइतपत अतिरिक्त (कुटुंबाची वर्षभराची खाण्याची तरतूद करून उरेल इतके) धान्यधुन्य त्याच्यापाशी नसतेच मुळी. त्यामुळे, उदारीकरणाद्वारे अन्नधान्य पिकांच्या बाजारभावांची पातळी वाढली तरी अशा लहान शेतक-यांच्या उत्पन्नावर त्याचा काहीच सकारात्मक परिणाम होत नाही. उलट, जेव्हा कुटुंबाची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी त्याला खुल्या बाजाराची वाट धरावी लागते तेव्हा चढ्या किंमतींना धान्य विकत घेण्याची परवशता

त्याच्यावर ओढवते. म्हणजे, त्याच्या वास्तवातील उत्पन्नाचा आणि पर्यायाने कुटुंबाच्या कल्याणाचा -हासच होतो. म्हणजेच, उदारीकरणाचे लहान शेतक-यांवर होणारे संभाव्य परिणाम हे वस्तुतः त्याच्या जमिनीच्या आकारमानाइतकेच पीकपद्धती, जमिनीची उत्पादकता, बाजारपेठेत विकण्याइतपत अतिरिक्त उत्पादनाची उपलब्धता अशा अनेकानेक बाबींवर निर्भर असते, असा या गटातील संशोधकांचा निष्कर्ष सांगतो.

याचा व्यवहारात परिणाम असा झालेला दिसतो की, उदारीकरणाचा आणि पर्यायाने जागतिकीकरणाचा लहान शेतक-यांवर नेमका काय प्रभाव पडतो, यांबाबतचे प्रत्यक्षातील चित्र हे मोठे मजेशीरच दिसते. शेतमालाच्या देशी बाजारपेठांची नाळ उदारीकरणाद्वारे जागतिक बाजारपेठेशी जोडली गेली की, या दोन्ही ठिकाणच्या किंमतींमधील बदलांची दिशा परस्परांशी सुसंगत बनते. हे स्वाभाविकच आहे. त्यामुळे होते असे की, समजा एखाद्या वस्तूची स्थानिक बाजारपेठेमधील किंमत ही त्याच वस्तूच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमधील किंमतीपेक्षा कमी असेल तर, खुलेपणाने व्यापार सुरू झाल्यानंतर स्थानिक बाजारपेठेतील त्या वस्तूची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या पातळीपर्यंत उंचावते. तसेच, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमती या स्थानिक बाजारपेठेतील किंमतींपेक्षा समजा कमी असतील तर, उदारीकरणाद्वारे स्थानिक बाजारपेठेतील किंमती आंतरराष्ट्रीय किंमतपातळीपर्यंत उतरतात. तसे घडणे हे स्वाभाविकच ठरते. स्थानिक बाजारपेठांमधील अलवचिकतेपायी अथवा संस्थात्मक अकार्यक्षमतांपायी हे घडले नाही तर, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तुलनेने कमी बाजारभावांना उपलब्ध असलेला माल स्थानिक बाजारपेठेत प्रवेश करून ती काबीज करतो आणि पर्यायाने स्थानिक उत्पादकांवर गंडांतर ओढवते. यातही पुन्हा, तुलनेने अधिक भरडले जातात ते लहान शेतकरीच. मक्याच्याबाबतीत फिलिपाइन्स आणि मेक्सिकोमध्ये नेमके हेच घडले.

उदारीकरणाद्वारे जागतिक बाजारपेठांशी जोडल्या गेलेल्या स्थानिक बाजारपेठांमध्ये जागतिक बाजारपेठेतील चढ-उतारांचे प्रतिबिंब पडावे, हेही ओघानेच येते. याचा एक परिणाम म्हणजे, स्थानिक बाजारपेठांमधील शेतमालाच्या बाजारभावांत अनुभवास येणा-या चढ-उतारांची वारंवारता आणि तीव्रता यांत वाढ घडून आल्याचे अभ्यासकांना अनेक ठिकाणी आढळून आले आहे. या सगळ्याचे देशोदेशीच्या लहान शेतक-यांवर होणारे परिणाम हे वेगवेगळे आहेत. त्यांत काही एक 'पॅटर्न' असा दिसत नाही. मुख्य म्हणजे, उदारीकरणानंतर ज्या शेतमालांचे बाजारभाव जेव्हा वाढतात त्यानुसार आपापल्या पीकपद्धतीमध्ये बदल घडवून आणणे हे ठिकठिकाणच्या लहान शेतक-यांना शक्य

बनतेच असे नाही, हे वास्तव सातत्याने सामोरे आले आहे. कारण, पीकपद्धतीमध्ये बदल घडवून आणणे, ही सहजशक्य कोटीतील बाब नसते. त्यामुळे, उदारीकरणानंतर विस्तारलेल्या बाजारपेठांचे पुरेपूर लाभ पदरात पाडून घेणे लहान शेतक-यांना जमतेच असे नाही, या निष्कर्षाप्रत आजवरचे संशोधन येऊन ठेपले आहे.

**वाढीव बाजारभाव, वाढते वेतनदर**

शेतमालाच्या जागतिक बाजारपेठेतील चढत्या किंमतींचा लाभ ज्या शेतक-यांना मिळतो त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागांमध्ये रोजगारनिर्मितीसही चालना मिळते, असे दाखलेही काही ठिकाणी मिळतात. हा रोजगार शेती, शेतीसंलग्न, शेतीपूरक तसेच बिगर शेती क्षेत्रांतही निर्माण होतो. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी गुंफण झालेल्या शेतक-यांच्या उत्पन्नात त्यांच्या उत्पादनांना किफायतशीर बाजारभाव मिळाल्याने जी वाढ घडून येते त्यातून ग्रामीण भागांत निर्माण होणा-या क्रयशक्तीशी हा सारा रोजगार निगडित असतो. वर्षात एकच पीक घेणे शक्य असल्याने तेवढा एक हंगाम झाल्यानंतर घरच्या शेतात काहीच काम न उरल्याने मुख्यतः मजुरीवरच उपजीविका निर्भर असणा-या लहान शेतकरी, अल्प तसेच अत्यल्प भूधारक शेतक-यांना या सा-या रोजगारनिर्मितीचा आधार मिळतो. पर्यायाने, शेतीच्या उत्पन्नाला पूरक असा बिगर शेती उत्पन्नाचा एक स्रोत लहान शेतकरी वर्गाला ग्रामीण भागांतच उपलब्ध होतो. यातून या समाजसमूहाची अन्नविषयक तसेच जीवनविषयक सुरक्षा मजबूत होण्यास हातभार लागतो.

याचा आणखी एक फायदा म्हणजे, अन्नधान्याचे नक्त खरेदीदार असणा-या लहान शेतक-यांना उदारीकरणापायी उंचावलेल्या अन्नधान्य किंमतींपायी जी हलाखी सहन करावी लागते, त्यावर उतारास्वरूप, शेतीपूरक वा बिगर शेती उद्योगव्यवसायांत निर्माण होणा-या रोजगार संधी आणि वाढणारे मजुरीचे दर यांच्या रूपाने काही एक दिलासाही दीर्घकालात मिळू शकतो. ग्रामीण भागांतील बिगर शेती रोजगार संधींच्याद्वारे मिळणा-या उत्पन्नाचा लहान शेतक-यांच्या एकंदर उत्पन्नात असणारा वाटा चांगला लक्षणीय असल्याचा काही अभ्यासांचा दाखला आहे. लॅटिन अमेरिकेतील काही देशांमधील ग्रामीण रहिवाश्यांच्या एकंदर उत्पन्नात अशा बिगर शेती उत्पन्नाचा असलेला वाटा १९९०च्या दशकाच्या अखेरीस जवळपास ४६ टक्क्यांइतका लक्षणीय असल्याचे अभ्यासांती आढळून आले होते. आफ्रिका आणि आशिया खंडांत हेच प्रमाण अनुक्रमे ४५ टक्के आणि ३५ टक्के असे होते. या बाबतीत आशिया खंडातील चित्र अंमळ निराळे दिसते. ग्रामीण भागांतील बिगर शेती स्रोतांद्वारे मिळणा-या उत्पन्नापेक्षाही शहरांकडे

केल्या जाणा-या हंगामी स्थलांतराद्वारे मिळणा-या उत्पन्नाचा लहान शेतक-यांच्या एकंदर उत्पन्नात भरीव हिस्सा आल्याचे काही अभ्यास सांगतात. आशिया खंडातील काही देशांमध्ये तर, ग्रामीण बिगर शेती रोजगारातून मिळणा-या उत्पन्नापेक्षा शहरांकडे केल्या जाणा-या हंगामी स्थलांतराद्वारे मिळणारे उत्पन्न किती तरी अधिक असल्याचे ध्यानात येते. भारत आणि थायलंडसारख्या देशांत हे वास्तव प्रकर्षाने आढळून येते तर, चीनमध्ये अर्धवेळ शेतीची प्रथा सर्वदूर पसरलेली दिसते.

उदारीकरणामुळे लहान शेतक-यांवर होणा-या संभाव्य अथवा प्रत्यक्षातील परिणामांचा अभ्यास करणा-या देशोदेशीच्या संशोधनांच्या अंगभूत मर्यादाही ब-याच असल्या तरी या अभ्यासांचे दोन प्रमुख निष्कर्ष या संदर्भातील धोरणनिश्चितीसाठी अतिशयच उपयुक्त ठरणारे आहेत. शेतमालाच्या मुक्त व्यापाराचे लहान शेतक-यांवर घडून येणारे परिणाम बव्हंशी प्रतिकूलच असले तरी त्यांपासून या समाजघटकाचे संरक्षण करण्यासाठी व्यापाराच्या उदारीकरणाबरोबरच अन्य पूरक धोरणेही राबविणे इष्ट ठरते, हा यांतील पहिला धडा. जमिनींचे फेरवाटप, ग्रामीण रोजगारनिर्मिती योजना, करप्रणाली तसेच सरकारी खर्चाची फेररचना यांसारख्या उपक्रमांचा यांत अंतर्भाव होतो. शेतमालाच्या व्यापाराचे उदारीकरण घडवून आणत असतानाच ग्रामीण भागांतील रहिवाश्यांच्या उत्पन्न स्त्रोतांमधील वैविध्य वाढविण्यासाठी प्रयत्न सर्वतोपरी जारी ठेवणे, हा या अभ्यासांचा दुसरा सांगावा.

शेतमालाच्या मुक्त व्यापाराचा फायदा सर्वच लहान शेतक-यांना सरसकट मिळत नाही, हेही एक निरीक्षण आजवरच्या संशोधनांमधून हाती आले आहे. ज्या लहान शेतक-यांना त्यांच्या उत्पादन तसेच पीकपद्धतीशी सुसंवादी, त्यांनी पिकविलेल्या शेतमालाचे मूल्यवर्धन घडवून आणू शकणारे असे पुढचे दुवे (फॉरवर्ड लिंकेजेस्) उपलब्ध आहेत (उदाहरणार्थ, मक्यापासून 'कॉर्न फ्लेक्स' बनविणे अथवा संत्र्यांपासून सरबत अथवा जेली बनविणे), आपण पिकविलेल्या शेतमालाची सुलभ विक्री करण्याची यंत्रणा ज्यांच्या हाताशी आहे, ज्यांचा व्यावसायिक धागा निर्यातदारांशी जुळलेला आहे, सहकारी वा संयुक्त शेतीसारखे संस्थात्मक प्रयोग राबवून ज्या लहान शेतक-यांनी आपली सौदा शक्ती मजबूत बनविलेली आहे, पतपुरवठा तसेच पायाभूत नागरी सुविधांप्रती ज्या लहान शेतक-यांना सुलभ 'ॲक्सेस' उपलब्ध आहे असे लहान शेतकरी शेतीच्या उदारीकरणाचे लाभ आपल्या पदरात पाडून घेऊ शकतात, असे दिसते. धोरणकर्त्यांना हेच 'इन्पुटस्' तर हवे असतात ! ■■

# .... म्हणून विरोध खुल्या व्यापाराला !

विविध देशांमधील चर्चाविश्वाचे अवकाश व्यापणा-या 'जागतिकीकरण' व 'खुला व्यापार' या दोन संज्ञा-संकल्पना अलीकडे चांगल्याच वादग्रस्त ठरत चाललेल्या दिसतात. त्यांच्याशी संबंधित अनेकानेक मुद्यांचा ऊहापोह या दोन संज्ञा-संकल्पनांचे समर्थक आणि विरोधक आपापल्या परीने करीत असून लेख, ग्रंथ इत्यादींद्वारे आपल्या मतांचे प्रतिपादन करीत आहेत. ऑस्ट्रेलियातील अर्थतज्ज्ञ ग्रॅहम डंक्ले हे यांतीलच एक. समर्थकांना वाटते त्याप्रमाणे जागतिकीकरणाचे व खुल्या व्यापाराचे चांगले परिणाम दिसून येत नाहीत, असे डंक्ले म्हणतात. जागतिक बँकेने निर्यातोन्मुख खुल्या व्यापाराचा उदोउदो केला असला तरी त्यापेक्षा, लोकशाहीच्या मार्गाने गतिमान होणा-या आणि एकात्म जागतिक व्यवस्थेच्या दिशेने स्वयंप्रेरणापूर्वक वाटचाल करणा-या न्याय्य जागतिक व्यापार प्रणालीची अधिक गरज आहे, असे ते स्पष्ट करतात. 'फ्री ट्रेड : मिथ, रिॲलिटी ॲंड अल्टरनेटिव्ह्ज्' या ग्रंथात त्यांनी आपली भूमिका मांडली आहे.

परस्परांत गुंफलेल्या एकात्म व्यापारव्यवस्थेला चालना देण्याच्या हेतूने खुल्या व्यापाराची जी चर्चा जगभरात आजवर होत आलेली आहे ती एकंदर पाच गृहीतकांवर आधारलेली आहे. ही पाच गृहीतके अशीः (१) प्राचीन काळापासून माणसाने व्यापार केला असून एकंदर मानवी जीवनव्यवहाराचा तो एक अविभाज्य भाग आहे. (२) देवाणघेवाण करण्यासाठी खुला व्यापार, खुली बाजारपेठ आणि खाजगी क्षेत्राचा पुढाकार सर्वोत्तम व नैसर्गिक मार्ग ठरतो. (३) देशादेशांमध्ये वस्तू व सेवांच्या व्यापारास तौलनिक लाभ वा फायद्याचे (Comparative Advantage) अर्थशास्त्रीय तत्त्व पायाभूत कारणभूत असते. देशोदेशी उपलब्ध असणारी साधनसामग्री, त्या त्या देशाला मिळालेली नैसर्गिक देणगी आणि त्याचप्रमाणे देशोदेशींच्या उत्पादक घटकांच्या उत्पादकतेत असणा-या फरकामध्येच आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणा-या लाभांची बीजे दडलेली असतात. (४) व्यापारामुळे आणि विशेषतः खुल्या व्यापारामुळे सामान्यतः संबंधित सर्वांचाच फायदा होतो. (५) संख्यात्मकदृष्ट्या व्यापारात सतत हळूहळू वाढच झाली असून त्यावरून जागतिकीकरण व जागतिकवाद अटळ आहे, असे दिसते. खुल्या

आणि अनिर्बंध व्यापारास आजच अनेक ठिकाणी विरोध होताना दिसतो. खुल्या व्यापाराचे अनिष्ट परिणाम व्यवहारात दिसू नयेत या दृष्टीने सतर्क असणा-या संस्थ व यंत्रणा आज कार्यरत आहेत. पूर्वीच्या काळी हे काहीच नव्हते. तरीही मग खुल्या व्यापाराचा आग्रह त्या काळी धरला गेला असेल तर मग त्याचे नियमन करणारी कोणती प्रणाली त्या काळी अस्तित्वात होती, असा प्रश्न कोणाच्याही मनात उद्भवणे स्वाभाविकच आहे.

पूर्णपणे उदार व्यापार प्राचीन काळापासून व्यवहारात होता; पण, त्याच्याशी संबंधित असलेल्या मुद्यांचा अधिक सखोलपणे ऊहापोह करणा-या, व्यापारविषयक घडामोडींवर नियंत्रण ठेवणा-या पण प्रत्यक्ष बाजारपेठेत उलाढाल न करणा-या, भांडवलशाहीशी संबंध नसणा-या, नफा न मिळविणा-या अशा काही अनौपचारिक यंत्रणाही प्राचीन काळी अस्तित्वात होत्या, असे काही अभ्यासकांनी नमूद केले आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक अशा चार विषयांशी संबंधित असलेल्या तत्कालीन यंत्रणांच्या कार्यपद्धतीत व्यापारविषयक तसेच अन्य आर्थिक व्यवहार सहजपणे बांधले गेले होते. त्यामुळे व्यापारविषयक घडामोडींवर नियंत्रण राहून सामाजिक न्याय व सांस्कृतिक बाबींचे रक्षण-संवर्धन घडून येत होते. या पाचही गृहीतकांच्या विविध पैलू-परिमाणांचा परामर्ष डंक्ले यांनी घेतला असून या गृहीतकांच्या आधारे खुल्या व्यापाराला प्रोत्साहन देणे योग्य ठरेल का, असा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच खुल्या व्यापाराचे वास्तवही पुढे आणले आहे. या सर्व विवेचनानंतर त्यांनी खुल्या व्यापाराच्या विरोधातील मते एकत्रितरीत्या वाचकांसमोर मांडली आहेत.

**खुल्या व्यापाराला विरोध का ?**

खुल्या व्यापाराच्या विरोधातील, त्याचप्रमाणे, काही विशिष्ट परिस्थितीत मुक्त व्यापाराच्या व्यवस्थेत मर्यादित स्वरुपाचा हस्तक्षेप शासन संस्थेने करावा, या भूमिकेचा पुरस्कार करणारी काही महत्त्वाची मते चार भागांत विभागण्यात आली आहेत. विविध देशांमधील नागरिक आपापल्या विचारधारांप्रमाणे वेगवेगळ्या गटांतील मते मान्य करतात.

(गट अ) परंपरागत आर्थिक मते -

(१) मूल्यतुल्यता दर (Terms of Trade) - जागतिक व्यापारामध्ये समाविष्ट असणारा वस्तू वा सेवांच्या बाजारपेठीय किंमतींवर प्रभाव घडवून आणण्याइतपत एखाद्या मोठ्या देशाची मागणी सशक्त असेल तर, अशा परिस्थितीत आयात-

निर्यातीवरील पर्याप्त शुल्क आकारणीच्या स्वरूपातील सरकारचा हस्तक्षेप वाजवी आणि आवश्यक ठरतो. कारण, बाजारपेठीय मागणी-पुरवठ्यावर प्रभाव टाकू शकणा-या अशा देशाकडून एखाद्या वस्तू अथवा सेवेस असणा-या मागणीत वाढ घडून आल्यास त्याची परिणती त्या वस्तू अथवा सेवेची बाजारपेठीय किंमत वाढण्यात होते. त्यामुळे व्यवहारात अंतिमतः तोटा त्या देशाचाच होतो. म्हणून, अशा वस्तू अथवा सेवेच्या देशांतर्गत मागणीस काही प्रमाणात तरी अटकाव करण्यासाठी त्या वस्तू वा सेवेच्या आयातीवर पर्याप्त दराने आयात प्रशुल्के आकारण्याचे पाऊल उचलावयाचे असे सरकारने ठरविले तर ते समर्थनीय ठरते.

(२) बाल्यावस्थेतील उद्योगांना संरक्षण - प्रगतीशील, नवऔद्योगिक देशांमधील उद्योगांना संरक्षण पुरविण्याच्या संदर्भात खुल्या व्यापारातील सरकारी हस्तक्षेपाचा पुरस्कार या अंगाने बव्हंशी केला जातो. औद्योगीकरणाची प्रक्रिया नव्यानेच वेगवान बनवून आर्थिक विकासाला चालना देणा-या प्रायः विकसनशील देशांना आपल्या अर्थव्यवस्थेमधील उद्योगांना परदेशी स्पर्धेपासून संरक्षण पुरविण्याची दक्षता घेणे भागच पडते, ते आवश्यकही असते. विशेषतः, नव्यानेच औद्योगिक विकास साधत असलेल्या देशांना ही खबरदारी घ्यावीच लागते. कारण, नव्यानेच अस्तित्वात आलेले उद्योग आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रस्थापित उद्योगांच्या तगड्या स्पर्धेला तोंड देण्याइतपत सशक्त बनलेले नसतात. हे उद्योग नव्यानेच स्थापन झालेले असल्याने त्यांचा उल्लेख 'बाल्यावस्थेतील उद्योग' (Infant Industry) असा केला जातो. आकारमान, तंत्रज्ञान, उत्पादकता अशा सर्वच बाबतींत नव्यानेच कार्यरत झालेले हे उद्योग जागतिक स्तरावरील मोठ्या उद्योगांच्या स्पर्धेमध्ये खुल्या व्यापाराच्या माध्यमातून ढकलले गेल्यास त्यांचा तेथे टिकावच लागणार नाही, ते मरतील आणि पर्यायाने संबंधित विकसनशील देशामधील एकंदर औद्योगीकरणाच्या प्रक्रियेलाच खीळ बसेल, हे अशा उद्योगांना संरक्षण पुरवण्यामागील तर्कशास्त्र होय.

(३) सामाजिक परिव्यय - (एक्सटर्नलिटिज्) कारखान्यांमधून बाहेर पडणा-या टाकाऊ पदार्थांमुळे हवा, पाणी, जमीन यांचे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी शासन यंत्रणेचा हस्तक्षेप अनिवार्य ठरतो. नैसर्गिक साधनसामग्रीची प्रदूषणामुळे होणारी हानी म्हणजे एक प्रकारे समाजाला भोगावी लागणारी किंमत असते. संबंधित उद्योगांच्या उत्पादन खर्चात मात्र या खर्चाचा अंतर्भाव केला जात नाही. कारण उद्योगांच्या लेखी तो खर्च 'बाहेरचा' (एक्सटर्नल) असतो. सामाजिक मालकीच्या नैसर्गिक, पर्यावरणीय

साधनसामग्रीचा होणारा असा -हास ज्या वेळी देशांतर्गत उपायांद्वारे रोखला जाऊ शकत नाही तेव्हाच सरकारी हस्तक्षेपाद्वारे त्याचे नियंत्रण करण्यास खुल्या व्यापाराचे समर्थक आपला रुकार दर्शवितात.

(४) तडजोडीचा दुस-या क्रमांकाचा पर्याय - व्यापारविषयक घडामोडींच्या संदर्भात निर्णय घेताना देशांतर्गत धोरण आखून कृती करणे शक्य होत नाही, तेव्हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यापारविषयक धोरणांमुळे होणारा हस्तक्षेप हा तडजोडीचा दुसरा (सेकंड बेस्ट) पर्याय ठरतो. खुल्या व्यापाराच्या पाठिराख्यांना तो स्वीकारार्ह वाटतो तो केवळ याच एका कारणासाठी..

(५) 'डंपिंग'ला प्रतिबंध - एखादी वस्तू अथवा सेवा निर्माण करण्यासाठी जेवढा खर्च येतो त्या खर्चापेक्षाही कमी बाजारभावाने ती वस्तू वा सेवा विकणे याला 'डंपिंग' असे म्हणतात. सर्वसाधारणपणे, बाजारपेठ काबीज करण्यासाठी या पर्यायाचा वापर केला जातो. आपल्या स्पर्धकांची बाजारपेठ आपल्याकडे खेचून घेणे, हा 'डंपिंग'चा आद्य हेतू. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये, दुस-या देशाची बाजारपेठ व्यापण्यासाठी 'डंपिंग'चे हत्यार उपसले जाते. त्यामुळे,, त्या अर्थव्यवस्थेतील स्थानिक उद्योगधंद्यांवर संक्रांत येते. कारण, 'डंपिंग'द्वारे स्थानिक बाजारपेठेत उतरलेल्या परदेशी वस्तू अथवा सेवेच्या स्पर्धेत मग स्थानिक उत्पादने टिकू न शकल्याने स्थानिक उद्योगांचे अस्तित्वच धोक्यात येते. त्यामुळे, अशा 'डंपिंग'ला प्रतिबंध करण्यासाठी खुल्या व्यापारात परिणामकारक हस्तक्षेपाची आवश्यकता भासते. परंतु, एखाद्या देशाकडून त्याच्या विविक्षित वस्तू अथवा सेवेचे असे 'डंपिंग' केले जाते आहे, हे सिद्ध करणे व्यवहारात अतिशय किचकट असते. तसेच, 'डंपिंग'च्या निमित्ताने खुल्या व्यापारात अनावश्यक हस्तक्षेप करण्यास शासन संस्थेस वाव मिळतो, अशीही तक्रार खुल्या, अनिर्बंध व्यापाराचे समर्थक करताना दिसतात.

(६) महसूलाचा संचय (Revenue Raising) - आयात-निर्यातीवर केली जाणारी शुल्क आकारणी, हा सरकारच्या लेखी उत्पन्नाचा व महसूल संकलनाचा एक महत्त्वाचा मार्ग असतो. त्यामुळे, शक्य तेवढी शुल्क आकारणी व वसूल व्यवहारात जारी करण्याकडे शासन संस्थेचा कल संभवतो. मात्र, अनिर्बंध व्यापाराच्या पाठिराख्यांना ही भूमिका अमान्य असते. त्यांच्या म्हणण्यानुसार, महसूल जमा करण्याचे (आयात-निर्यात शुल्कांखेरीज) अन्य पर्याय सरकारला खुले असतात. त्यांचा अवलंब करण्याऐवजी प्रशुल्क आकारणीद्वारे खुल्या व्यापारात हस्तक्षेप केला जातो, हे त्यांना मान्य नाही.

(गट ब) नवमतवादी आर्थिक मते -

(१) व्यापार तोलातील संतुलन - आयात व निर्यातीमधील असंतुलनामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या ताळेबंदातील असमतोल दूर करण्यासाठी प्रतिबंधात्मक संरक्षणाचे कवच देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला पुरविणे हे अशा देशाच्या सरकारच्या लेखी आवश्यक आणि उपयुक्तही ठरते. विशेषतः, निर्यातीच्या तुलनेत आयात सातत्याने अधिक राहिली तर व्यापारतोलात जी तूट येते तिच्यावर उपाय म्हणून आयातीवर, प्रसंग व वेळेनुरूप, आयात शुल्क आकारण्याचा पर्याय अवलंबणे शासन संस्थेला व्यवहारात आवश्यक बनते. आयात करण्यात आलेल्या वस्तूंच्या देशी बाजारपेठेतील किंमती अशा शुल्क आकारणीमुळे वाढून पर्यायाने स्थानिक मागणीला पायबंद बसतो व कालांतराने आयात-निर्यातीतील तूट आटोक्यात येते. खुल्या व्यापाराच्या समर्थकांना मात्र शुल्क आकारणीद्वारे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यापेक्षा विनिमय दरांतील ठाकठीक अधिक स्वीकारार्ह वाटते.

(२) रोजगारनिर्मितीस चालना : आयातीवर लागू करण्यात आलेल्या अनुरूप अशा निर्बंधांमुळे अथवा निर्यातीस पुरविल्या गेलेल्या उत्तेजनामुळे देशी उद्योगांच्या विस्तारास अवकाश प्राप्त होऊन त्याद्वारे देशांतर्गत गुंतवणूक तसेच रोजगारनिर्मितीस चालना मिळते. पूर्णपणे खुल्या व अनिर्बंध व्यापाराद्वारे हे शक्य होईलच, याची हमी देता येत नाही. आयातीवर प्रतिबंध घालून देशी उद्योगांना परदेशी स्पर्धेपासून संरक्षण पुरविणे तसेच/अथवा निर्यातोन्मुख उद्योगांना आधाराचा टेकू पुरवून त्यांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढवण्याने देशी उद्योगधंद्यांना चालना मिळते. परंतु, मुक्त स्पर्धेच्या पाठिराख्यांना मात्र हा प्रतिवाद सहजासहजी मान्य होणारा नाही. या गटाच्या मते, अर्थव्यवस्थेमध्ये मुळातच बेरोजगारी असेल तर खुल्या व्यापारात सरकारने केलेला अशा प्रकारचा आयात प्रतिबंधात्मक अथवा निर्यातपूरक हस्तक्षेप उपयुक्त आणि समर्थनीय ठरतो.

(३) पुढे गेलेल्यांशी बरोबरी : अंगभूत क्षमतांच्या आधारे विकासाच्या प्रक्रियेत पुढे निघून गेलेल्या अर्थव्यवस्थांशी बरोबरी साधण्यासाठी पिछाडीवर राहिलेल्या अर्थव्यवस्थांना व्यापारविषयक संरक्षणांचा आधार घेण्याची गरज भासू शकते.

(४) निवडक लाभांसाठी व्यूहात्मक रचना : अर्थव्यवहारांच्या क्षेत्रातील काही विशिष्ट उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून तेथपर्यंत पोहोचणे देशी उद्योग-व्यवसायांना शक्य बनावे, यांसाठीची व्यूहात्मक रचना म्हणून निवडक संरक्षणाचे कवच आंतरराष्ट्रीय व्यापाराला

पुरविण्याचा मार्ग अवलंबिला जाऊ शकतो. काही विविक्षित उद्योगांच्या तौलनिक लाभांचे (Comparative Advantage) बळकटीकरण घडून यावे, नवप्रवर्तनाचे व्यापारी लाभ संबंधित उद्योगक्षेत्रांना मिळावेत, उत्पादनाच्या नवीनच क्षेत्रात सर्वांत प्रथम प्रवेश करून तिथे व्यावसायिक बस्तान बसविणे शक्य व्हावे, अ-परिपूर्ण स्पर्धेने युक्त असलेल्या बाजारपेठीय व्यवस्थेमध्ये नफ्याचा अधिकांश देशी उद्योगांच्या वाट्यास यावा, अशासारख्या काही हेतूंच्या परिपूर्तीसाठी आवश्यक ठरणारी व्यूहात्मक रचना या स्वरूपांत मुक्त व्यापारात हस्तक्षेप करण्याचे धोरण शासन संस्था निवडक बाबींत जाणीवपूर्वक अवलंबू शकते.

(५) श्रमशक्तीच्या विनियोगाची फेररचना : खुल्या व्यापारातील हस्तक्षेपाद्वारे देशी उद्योगांना संरक्षण आणि प्रोत्साहन पुरविण्याच्या शासन संस्थेच्या धोरणामुळे देशी उद्योगांना चालना मिळते. त्यातून या उद्योगव्यवसायांतील गुंतवणूक वाढून त्याद्वारे रोजगार संधीही विस्तारू लागतात. यातून, शेतीसह अर्थव्यवस्थेच्या एकंदरच प्राथमिक क्षेत्रामध्ये गुंतलेले अतिरिक्त मनुष्यबळ तेथून काढून ते बिगर शेती उद्योगांकडे वळविण्याचे मार्ग प्रशस्त बनतात. त्यामुळे, शेतीसह एकूण प्राथमिक क्षेत्राची उत्पादकता सुधारते. उत्पादकता उंचावल्याने ग्रामीण परिसरातील क्रयशक्ती वाढते. त्यातून उद्योगांना पुन्हा चालना मिळते. अर्थकारणाची वाटचाल स्वयंपूर्ण बनते.

(गट क) परंपरागत आर्थिकेतर मते -

(१) देशाची संरक्षणविषयक भूमिका - देशाचे संरक्षण करण्याच्या उद्दिष्टाने लागणारी साधनसामग्री तयार करण्यासाठी देशांतर्गत उद्योगांना चालना देणे व त्यासाठी विशेष संरक्षण देणे, ही इथे हस्तक्षेपामागील प्रेरणा असते. कारण, संरक्षणात स्वयंपूर्ण असणे ही कोणत्याही देशासाठी अतिशय महत्त्वाची बाब गणली जाते. संरक्षणसंलग्न उद्योगांना मिळणा-या सवलतींचा तसेच व्यापारविषयक संरक्षक आच्छादनांचा लाभ उठविण्याचा प्रयत्न करण्यासाठी अन्य उद्योगही मग नाना प्रकारच्या क्लृप्त्या लढवतात, या कारणासाठी खुल्या व्यापाराच्या समर्थकांचा या पर्यायास विरोध असतो.

(२) अन्नधान्यविषयक सुरक्षा - कोणताही देश अन्नधान्याच्या उपलब्धतेबाबत स्वयंपूर्ण असायला हवा. म्हणजे, देशातील नागरिकांची दैनंदिन गरज भागविण्यासाठी अन्नधान्य आयात करावे लागू नये, ही त्यामागील भूमिका. त्यामुळे आपल्या देशातील शेतीचे उत्पादन वाढवणे, शेतमालाला योग्य भाव देणे आणि एकूणच कृषिउद्योगाला संरक्षण देणे हे विविध देशांतील सरकारांसाठी महत्त्वाचे ठरते. खुला व्यापार करणारे मात्र ही

बाब मान्य करीत नाहीत. अन्नधान्याची आयात हाही संबंधित देशाला अथवा देशांना अन्नविषयक सुरक्षा प्रदान करण्याचा एक मार्ग आहे, असे त्यांना वाटते.

(३) प्रतिकारात्मक उपाययोजना - आपल्या देशात तयार होणा-या वस्तू व सेवांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता बलवान होण्याच्या दृष्टीने अशा वस्तू व सेवांच्या उत्पादन खर्चात कपात शक्य व्हावी यासाठी एखाद्या देशाचे सरकार संबंधित वस्तूंच्या उत्पादकांना काही अनुदाने देत असेल तर, त्या देशामधून आयात केल्या जाणा-या उत्पादन वा सेवांवर अन्य देशांनी प्रतिशुल्क आकारावे, हेही आर्थिकदृष्ट्या स्वाभाविकच ठरते. अन्यथा, त्यातून अ-समान पायावरील स्पर्धात्मक वातावरण तयार होते. अनुदानांचा टेकू पुरविलेली अशी उत्पादने आयात करणा-या देशांमधील उद्योगांच्या मुळावर अशी अ-समान स्पर्धा येते.

<u>(गट ड) इतर मते -</u>

(१) सर्वसाधारण स्वयंपूर्णता - आपण सर्वच बाबतींत स्वयंपूर्ण असावे, असे कोणत्याही देशाला वाटणे स्वाभाविक असते. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी अनेक उद्योगांच्या संदर्भात संरक्षणवादी (प्रोटेक्शनिस्ट) भूमिका घ्यावी लागते. साहजिकच, खुल्या व्यापाराच्या समर्थकांना ही भूमिका पटणारी नाही.

(२) सामाजिक परिव्यय (सोशल कॉस्ट) - आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होण्याच्या उद्दिष्टाने देशांतर्गत उद्योगधंदे उभे करीत असताना, पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देताना संबंधित देशांत काही धोरणात्मक बदल घडवून आणावे लागतात. त्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत असतात. उदाहरणार्थ, उद्योगांचे नवीन जागी पुनर्निर्माण शक्य बनवणे, उद्योगव्यवसायांना त्यासाठी जमिनी मिळवून देणे, परिणामी, नागरिकांचे स्थलांतर व त्यांचे पुनर्वसन करावे लागणे, रोजगार मिळण्यासाठी कामगार-कर्मचा-यांना नवीन कौशल्ये शिकावी लागणे ... ही त्याची काही उदाहरणे. यांसारख्या बाबींसाठी शासन संस्थेस करावा लागणारा खर्च हा एक प्रकारे समाजावर पडणारा आर्थिक भारच असतो.

(३) सांस्कृतिक आक्रमण - खुल्या व्यापारामुळे विविध देशांमधील संस्कृतींच्या नागरिकांचा परस्परांशी परिचय होतो, संस्कृतींशी संबंधित सर्व प्रकारचे आदानप्रदान वाढते. मात्र, त्याच वेळी अन्य संस्कृतींमधील अनिष्ट बाबींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यताही बळावते.

(४) सार्वभौमतेचा संकोच - जागतिकीकरण आणि मुक्त व्यापार यांपायी राष्ट्रीय

सार्वभौमत्वाचा संकोच आपाततः होतच असतो. 'गॅट' करारासारख्या बहुपदरी व्यापारी करारमदार प्रणालीमुळे व्यापार आणि राष्ट्रीय सार्वभौमत्व या दोहोंची राखण करणारे पर्याय निवडण्यासंदर्भातील लवचिकता राष्ट्रीय सरकारांपाशी उरत नाही. एक प्रकारे, देशाच्या सार्वभौमत्वाचा तो आत्मघातच ठरतो.

(५) विपरीत सामाजिक परिणाम - जागतिकीकरण व खुला व्यापार यांसंबंधीची धोरणे आखताना व राबविताना विविध समाजघटकांवर प्रसंगी विपरीत परिणाम होऊ शकतात. विशेषतः, ग्रामीण भागांतील जनजीवनावर, स्त्रियांवर, अल्पसंख्य गटसमूहांवर त्याचे वेगवेगळ्या प्रकारे परिणाम होतात असे आढळून येते. अशा काही समाजघटकांचे अथवा समूहांचे शोषण होण्याच्या शक्यता वाढतात. त्यांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो, पण श्रमाचा मोबदला योग्य मिळेलच याची हमी नसते.

(६) स्थानिकांना प्राधान्य - जागतिकीकरणामुळे व खुल्या व्यापारामुळे घडून येणा-या विकासप्रक्रियेत स्थानिकांच्या हिताला प्राधान्य द्यायला हवे. त्यांना विस्थापित करून वा त्यांच्या रोजगाराच्या संधी हिरावल्या जाऊ नयेत. पण बरेचदा तसे घडत नाही. मग, स्थानिकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी शासनसंस्थेस हस्तक्षेप करण्यावाचून अन्य पर्यायच राहत नाही.

खुल्या व्यापाराच्या विरोधातील अशी विविधांगी कारणे लक्षात घेऊन डंक्ले यांनी 'एकात्म जागतिकतावादा'ऐवजी (इंटिग्रेटिव्ह ग्लोबॅलिझम) 'सहकारी आंतरराष्ट्रीयवाद' (को-ऑपरेटिव्ह इंटरनॅशनॅलिझम) अशी आदर्शवादी पर्यायी भूमिका मांडली आहे. त्यानुसार देशादेशांमध्ये, विविध समाजगटांमध्ये जागतिक पातळीवरील एक प्रकारचे सामंजस्याचे, सहकार्याचे वातावरण असेल. मानवाधिकार, पर्यावरण अशा काही महत्त्वाच्या मुद्यांबाबत देशोदेशांनी आखलेल्या धोरणांमध्ये एक सुसंवादपूर्ण आंतरिक सुसंगती आंतरराष्ट्रीय पातळीवर आकारास येईल. या सुसंगतीचे पालन करणे सर्वांना बंधनकारक राहील. मग, आंतरराष्ट्रीय व्यापार हा वादग्रस्त विषय ठरणार नाही. परिणामी, देशोदेशींचे सामाजिक-सांस्कृतिक वातावरण सहकार्याचे व सौहार्दपूर्ण राहील. मुख्य म्हणजे, या अशा वैश्विक व्यवस्थेमध्ये प्रत्येक देशाची राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक सार्वभौमता अबाधित राहील. देशोदेशींच्या अर्थव्यवस्थांची परस्परांतील गुंफण ही सहजस्वाभाविक, स्वयंनिर्णयी आणि कोणाही बाह्य संस्थेच्या मर्जीनुसार वळणारी-वाकणारी नसेल. साहजिकच, अशा वातावरणात जगाची वाटचाल उज्ज्वल भवितव्याकडेच होईल, अशी त्यांची धारणा आहे. ■■

# न्याय्यतेच्या दिशेने....

जागतिकीकरणामुळे सामाजिक व आर्थिक विषमता वाढत असल्याची तक्रार जागतिकीकरणविरोधी गट कायम करत असतात. ही विषमता कमी करून न्याय्य जग कसे अस्तित्वात येईल, हा आता कळीचा प्रश्न बनला आहे. त्यामुळे पर्यावरण जपायचे की आर्थिक विकासाला महत्त्व द्यायचे ? मर्यादित नैसर्गिक संसाधने, वाढती लोकसंख्या आणि सातत्यपूर्ण न्याय्य विकास यांची सांगड कशी घालायची ? जागतिकीकरणामुळे एकूणच विकासप्रक्रियेला गती मिळाल्याने आणि खनिज तेल, पाणी, वनसंपत्ती, अन्नधान्याची सुरक्षा इत्यादी विषयाशी संबंधित प्रश्नांची तीव्रता वाढल्याने या मुद्यांवरून देशांतर्गत व देशादेशांत अशांतता निर्माण झाली तर काय करायचे ?.... असे अनेक प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे ठरत आहेत. जर्मनीतील Wuppertal Instituteनेही या प्रश्नांकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. या प्रश्नांचा सर्वंकष विचार करण्यासाठी संस्थेने प्रवर्तित केलेल्या संशोधनपर अभ्यासाच्या आधारे Fair Future हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आला आहे. विविध विषयांतील सुमारे २० अभ्यासकांनी सतत तीन वर्षे केलेल्या या अभ्यासाद्वारे न्याय्य विकास कसा साधता येईल, याचा ऊहापोह करण्यात आला आहे.

**दरडोई अधिकार**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध देशांच्या अर्थव्यवस्था परस्परांशी जोडल्या गेल्या आहेत/जात आहेत. आर्थिक विकास हा सर्वच देशांसाठी महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. त्यामुळे अनेकानेक देशांमध्ये विविध क्षेत्रांत विकास घडवून आणण्याला प्राधान्य दिले जात आहे. या विकासाच्या मागे धावताना देशोदेशींचा पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनू लागला आहे. वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढते आहे. विशेषतः, कार्बन डायॉक्साइड या वायूच्या उत्सर्जनामुळे पृथ्वीचे तापमान वाढून पर्यावरणविषयक स्थिती अधिकच बिघडते आहे. या वायूच्या उत्सर्जनात विकसित देश आघाडीवर आहेत. विकसनशील देशांचा विकास होण्याच्या प्रक्रियेत कार्बन डायॉक्साइडचे उत्सर्जन होते तर, विकसित राष्ट्रांमधील नागरिकांच्या जीवनशैलीमुळे हे उत्सर्जन अधिक

प्रमाणात घडून येते. त्यामुळे सातत्यपूर्ण न्याय्य विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी याबाबतीत दोघांना समान पातळीवर यावे लागेल. विकसनशील देशांना प्रगतीचा अनुशेष भरून काढायचा असल्याने या वायूच्या उत्सर्जनाबाबत त्यांच्यावर बंधने आणण्यापेक्षा विकसित देशांमधील उत्सर्जनाची पातळी घटविणे उचित ठरेल. प्रगतीचा किमान टप्पा गाठण्यासाठी विकसनशील देशांमधील नागरिकांचे 'मानवाधिकार' आणि विकसित देशांमधील नागरिकांचे 'समृद्धीचे अधिकार' यांत विकसनशील देशांमधील 'मानवाधिकारा'चे पारडे जड आहे, हे समजून घेतले पाहिजे. शिवाय, दोन्ही गटांतील देशांमधून कमीतकमी उत्सर्जन होईल, याची काळजी घ्यावीच लागेल.

पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे वातावरणात होणा-या बदलांच्या परिणामांचा फटका समुद्रकिना-याजवळील विकसनशील देशांना मोठ्या प्रमाणावर जाणवणार आहे, या धोक्याच्या इशा-याकडे दुर्लक्ष न करता सामाजिक न्यायाचा विचार करून जागतिक पातळीवर कृती करावी लागेल. यासाठी आंतरराष्ट्रीय अभ्यास व करार महत्त्वपूर्ण ठरतील. उदाहरणार्थ, पृथ्वीच्या वाढत्या तापमानाबाबत 'इंटरनॅशनल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज'च्या (IPCC) अभ्यासातून पुढे आलेले निष्कर्ष आणि 'क्योतो प्रोटोकॉल'ची अंमलबजावणी होणे गरजेचे ठरेल. वातावरणाच्या प्रश्नासंदर्भात 'दरडोई अधिकार' मान्य करण्याची गरज आहे. याचा अर्थ असा की जगाच्या वातावरणावर जागतिक नागरिकांचा अधिकार आहे, हे मान्य करणे. असे केल्याने जागतिक वातावरणावर सर्वच देशांमधील नागरिकांचा समान अधिकार प्रस्थापित होईल आणि राष्ट्राराष्ट्रांमधील असमानता संपुष्टात येईल.

### नैसर्गिक संसाधनांवरील अधिकार

संपूर्ण मानवजातीसमोर अलीकडे नवनवीन आव्हाने उभी ठाकली आहेत. ती पर्यावरणाशी तसेच व्यापाराशी संबंधित आहेत. देशादेशांत गंभीर होत असलेला ऊर्जेचा प्रश्न आणि विविध समाजगटांकडून होणारा नैसर्गिक संसाधनांचा अमर्याद वापर ही ती आव्हाने आहेत. औद्योगिक व आर्थिक विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेत सर्वच देशांची ऊर्जेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते आहे. ऊर्जा मिळविण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर खनिज तेलाचा उपयोग करण्यात येतो. भूगर्भातील तेलाचे साठे आटत चालले आहेत, असा इशारा संबंधित तज्ज्ञ वेळोवेळी देत आहेत. खनिज तेल संपुष्टात आल्यानंतर खनिज तेलावर आधारित असलेले औद्योगिक व्यवहार अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऊर्जेच्या प्रश्नावर वेळीच तोडगा शोधण्याची गरज

आहे. पर्यायी ऊर्जेचा वापर करण्याचा प्रयोग अनेक देशांमध्ये होऊ लागला आहे. तरी अद्याप खनिज तेलापासून मिळणा-या ऊर्जेला मागे टाकेल, असा ऊर्जास्रोत सापडलेला नाही, हे ध्यानात घेतले पाहिजे.

विकसित देशांसाठी ऊर्जेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तर, नैसर्गिक संसाधनांचा प्रश्न विकसनशील देशांसाठी प्राधान्याचा ठरला आहे. औद्योगिक व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा होणारा अमर्याद वापर कसा रोखायचा हा एक यक्षप्रश्न आहे. कारण, विकसनशील देशांमधील लाखो नागरिकांचे दैनंदिन जीवन या साधनांवर अवलंबून आहे. ते त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. दक्षिण आशियातील अनेक देशांमधील तसेच आफ्रिकेतील लाखो नागरिक शेती, वनसंपत्ती, मासेमारी इत्यादींवर पोटासाठी अवलंबून आहेत. औद्योगिक विकास साधण्यासाठी त्यांचे जगण्याचे साधन हिरावले गेले तर या नागरिकांनी काय करायचे ? म्हणून नैसर्गिक साधनसंपत्तीवर अधिकार कुणाचा, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. आपल्या परिसरातील जैववैविध्यातील बारकावे स्थानिक नागरिकांना माहिती असतात. पिढयान्‌पिढ्या ते ज्ञान त्यांना मिळालेले असते. आपल्या निसर्गाचे रक्षण कसे करायचे हे त्यांना माहिती असते. त्यामुळे नैसर्गिक साधनांवर स्थानिकांचा अधिकार मान्य करायला हवा. या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात आलेल्या जैवविविध्य कराराचे पालन करण्याची जबाबदारी सर्व राष्ट्रांनी मान्य करायला हवी.

**खुल्या व्यापाराऐवजी न्याय्य व्यापार**

ज्याच्या हाती सत्ता असते त्याला नियम तयार करता येतात आणि जो नियम तयार करतो त्याच्या हाती सत्ता असते, हा जगाचा नियम आहे. आंतरराष्ट्रीय संस्था या नियमाला अपवाद ठरत नाहीत. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांबाबत असे घडले. जागतिक व्यापार संघटनेचा समावेश यातच होतो. या संस्थांच्या आतापर्यंतच्या नियमांप्रमाणे घडून आलेल्या व्यवहारांमुळे सामाजिक व आर्थिक विषमता वाढलेली आहे, असे तज्ज्ञांचे प्रतिपादन आहे. त्यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया पुढे नेताना न्याय्य व्यापाराचे उद्दिष्ट गाठले जावे, या दृष्टीने या संस्थांच्या नियमांची फेररचना हा मुद्दा आता चर्चेच्या केंद्रस्थानी असला पहिजे. विशेषतः, जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांमुळे सर्वांना समान संधी मिळणे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात तसे घडलेले दिसत नाही. अनुदाने, तंत्रज्ञानविषयक नियमने, पर्यावरणीय निकष इत्यादी बाबींमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात सर्वांना समान संधी मिळाल्याचे चित्र

आकारले नाही. औद्योगिक वस्तू वा सेवा यांप्रमाणेच कृषिक्षेत्राशी संबंधित उत्पादने, बौद्धिक संपदा कायदा यांबाबतच्या व्यवहारातही काही देश समाधानी नाहीत. जागतिक व्यापार संघटनेचे अधिकारक्षेत्र फार व्यापक असल्याने संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय श्रम संघटना, जागतिक आरोग्य संघटना, राष्ट्रसंघाचे पर्यावरणविषयक व विकासविषयक कार्यक्रम इत्यादी पिछाडीवर पडल्याचे चित्र अलीकडच्या काळात तयार झाले आहे. दोन राष्ट्रांमधील वादावर तोडगा काढण्याचेही अधिकार फक्त जागतिक व्यापार संघटनेकडे असल्याने ही एकच संघटना शक्तिमान बनली आहे. त्यामुळे सर्व राष्ट्रांचे व्यापारविषयक हित जपले जाण्याच्या उद्दिष्टाने जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांची फेररचना करणे सयुक्तिक ठरते.

खरे तर, जागतिक व्यापार संघटनेच्या सुयोग्य कार्यपद्धतीचा फायदा गरीब देशांना होऊ शकतो. कारण, द्विपक्षीय व्यापारात 'बळी तो कान पिळी' अशी परिस्थिती असू शकते. त्यामुळे गरीब देश अधिकच अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करताना; विकसनशील राष्ट्रांमधील नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे संघटनेचे एक उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. तथापि, आंतरराष्ट्रीय व्यापार वाढल्यानेच हे उद्दिष्ट गाठले जाईल किंवा कसे याबद्दल त्या वेळी स्पष्टता झालेली नव्हती. तेव्हा शिक्षण, सरकार आणि कायद्याने मिळणारी सुरक्षा हे यासाठी महत्त्वाचे घटक ठरतील, असे मत अनेक तज्ज्ञांनी मांडले होते. नंतर व्यापाराच्या माध्यमातून नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे मूळ उद्दिष्ट मागे पडले आणि त्यासाठी असणारे साधन - जागतिक व्यापार - हेच व्यापार संघटनेचे उद्दिष्ट बनले. त्यानंतरही पर्यावरणात सातत्य आणि मानवाधिकार ही मूल्ये बाजूला ठेवून, व्यापाराचे उद्दिष्ट गाठताना राहणीमानाच्या दर्जाला महत्त्व देण्यात येऊ लागले, तेव्हा व्यापारविषयक प्रकरणे अधिकच गुंतागुंतीची बनली. खुला व्यापार हा नेमका कोणत्या देशासाठी, कोणत्या परिस्थितीत आणि कशा प्रकारे करण्यात येतो हेदेखील महत्त्वाचे ठरते. सर्व देश एकसारख्या पातळीवर असतील तर खुल्या व्यापारात सर्वांना समान नियम लागू करता येणे योग्य ठरते. पण मुळात देशादेशांमधील परिस्थितीत असमानता असल्याने सर्वांना समान असे नियम लागू करणे उचित ठरेलच असे नाही. म्हणून खुल्या व्यापाराकडे वाटचाल करताना देशोदेशींच्या पर्यावरणाची, परिसरविज्ञानाची, मानवाधिकारांची आणि न्याय्यतापूर्ण व्यवहारांची सुयोग्य काळजी घेण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांची फेररचना करणे उचित ठरावे.

जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांमध्ये बदल करण्याच्या उद्दिष्टाने विविध देशांमध्ये घडून आलेल्या चर्चेतून तीन महत्त्वाचे मुद्दे पुढे आले. (१) पर्यावरणविषयक व मानवाधिकारविषयक किमान दर्जा कायम राखणे -विविध वस्तूंचे उत्पादन व खरेदीविक्रीविषयक व्यवहार करताना पर्यावरण व मानवाधिकार हे मुद्दे लक्षात टेवून त्यासाठी नियम आखणे व त्याच्या अंमलबजावणीसाठी व्यापारविषयक परवाना देणा-या संस्था स्थापणे (२) विविध देशांची विकासविषयक स्वायत्तता जपणे - विकासाचा आपापला मार्ग चोखाळण्याची प्रत्येक देशाची स्वायत्तता जपली जाणे. मुक्त व्यापाराची जागा व्यापारविषयक करारमदारांच्या जाळ्याने घेणे. (३) पर्यावरण व मानवाधिकारांना महत्त्व देणे - व्यापार संघटनेच्या व्यापारविषयक मूल्यांप्रमाणेच पर्यावरण व मानवाधिकार या मूल्यांचे सहअस्तित्व जागतिक अर्थव्यवस्थेत टिकवून ठेवणे तसेच संबंधित संस्थांमध्ये समन्वयाचे धोरण राबविणे. अभ्यासकांनी असेही सुचविले आहे की, पर्यावरणविषयक व मानवाधिकाराच्या विवाद्य मुद्यांची सोडवणूक करण्याचे कार्य जागतिक व्यापार संघटनेच्या यंत्रणेमार्फत करण्यात येऊ नयेत. यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर तटस्थ संस्था/यंत्रणा असणे गरजेचे आहे. त्यामुळे असे विषय आंतरराष्ट्रीय न्यायालयांमार्फत व तत्सम तटस्थ सस्थेमार्फत सोडविण्यात यावेत.

**कंपन्यांची नागरी कर्तव्ये**

आजमितीस खुल्या व्यापारात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आघाडी घेतली आहे. काही अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार एकूण जागतिक व्यापारापैकी सुमारे दोन तृतीयांश व्यापार बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे घडून येतो. या कंपन्या जणू एक आर्थिक साम्राज्यच असतात. उदाहरणार्थ, 'वॉलमार्ट'सारख्या बहुराष्ट्रीय कंपनीची उलाढाल (२००२ मध्ये २१८अब्ज डॉलर) ही ५० विकसनशील राष्ट्रांच्या एकत्रित ठोकळ राष्ट्रीय उत्पादनापेक्षाही (जीएनपी - २०७ अब्ज डॉलर) जास्त असल्याचे दिसते. आपल्या देशात परकीय गुंतवणूक व्हावी म्हणून विकसनशील देश या कंपन्यांना आपल्या देशात उत्पादन करण्याची परवानगी देतात. यामुळे विकसनशील देशांत काही प्रमाणात रोजगारनिर्मिती होते. पण या कंपन्या विकसनशील देशांमधील कर्मचा-यांचे शोषण करतात, अशी टीका केली जाते. उदाहरणार्थ, बांगलादेशातील वस्त्रोद्योगातील कर्मचा-यांचे शोषण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. शिवाय, काही कंपन्यांच्या कारखान्यांमुळे स्थानिक पर्यावरणाचेही नुकसान होते. त्यामुळे या कंपन्यांनी स्वतःहून आपली नागरी कर्तव्ये पार पाडावी आणि आपली सामाजिक जबाबदारी निभवावी अशी अपेक्षा केली जाते.

कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारीबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा झालेली आहे. सातत्यपूर्ण विकासासंदर्भात झालेल्या जागतिक परिषदेत या विषयाचा ऊहापोह करण्यात आला होता. मानवाधिकारांच्या संदर्भात बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच इतर औद्योगिक कंपन्या यांची जबाबदारी काय असावी, याबाबत संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकारविषयक समितीने काही नियम/आचारसंहिता निश्चित केली होती. तथापि, न्याय्यतेच्या दिशेकडे जाताना बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कामकाजासंदर्भात खालील चार मुद्यांचा विचार प्राधान्याने करायला हवा, असे या क्षेत्रातील संशोधक तसेच अभ्यासकांचे मत आहे.

(१) माहितीची उपलब्धता व पारदर्शकता - कंपनीच्या उत्पादनाबाबत व इतर कामकाजासंदर्भात पुरेशी माहिती उपलब्ध नसल्याने कंपनीच्या कामकाजाबाबत शंका घेण्यासारखी परिस्थिती निर्माण होते. नागरिक (ग्राहक) आणि कंपन्या यांच्यातील संवादात एक भिंत उभी राहते. नागरिकांचे (ग्राहकांचे) अधिकार व सार्वभौमता याचा तसेच लोकशाहीच्या तत्त्वांचा विचार करता कंपन्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याची गरज आहे. (२) मानवाधिकार व पर्यावरणीय अधिकार - कोणत्याही देशातील नागरिकांचे अधिकार देशोदेशींच्या सरकारांकडून जपले जाण्याची अपेक्षा असते. आता खुल्या व्यापाराकडे वाटचाल करताना 'जागतिक कंपन्या' व 'जागतिक नागरिक' असे समीकरण बनते/बनले आहे. त्यामुळे सरकारांप्रमाणेच नागरिकांचे अधिकार जपण्याचे काम कंपन्यांकडून व्हायला हवे. कामकाजात पारदर्शकता आणून आवश्यक तेथे - स्थानिकांशी संबंधित बाबींसंदर्भात - कंपन्यांनी स्थानिकांची संमती घेणे अपेक्षित आहे. (३) न्याय्य व समतोल संबंध - कामगारांची सुरक्षा व त्यांचे आरोग्य हे मुद्दे कंपन्यांसाठी प्राधान्याचे बनले पाहिजे. तसेच बालकामगाराचे श्रम न वापरण्याचा निर्णय कंपन्यांनी घेणे गरजेचे आहे. या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियमांचे, कायद्यांचे पालन व्हायला हवे. (४) कायद्याप्रती जबाबदारी - कंपन्या या समाजाला जबाबदार असल्या पाहिजेत. त्यामुळे नागरिक व कंपन्या यांच्या काही वाद निर्माण झाल्यास वा नुकसानभरपाईचा मुद्दा उपस्थित झाल्यास असे प्रश्न सोडविण्यासाठी एक निष्पक्ष व्यवस्था हवी. तसेच त्याला कायद्याचे बंधन हवे.

जागतिकीकरण व खुला व्यापार हे वास्तव आहे, ते नाकारण्यापेक्षा जगाने या संदर्भात न्याय्यतेची कास धरण्याची गरज आहे, या बाबत ठिकठिकाणी अलीकडे प्रकर्षाने विचारमंथन चालू आहे. ■■

# चळवळ विरोधाची

जागतिकीकरण ही रोखता न येण्याजोगी प्रक्रिया आहे याची जाणीव आता सगळ्यांनाच होऊ लागली आहे. मग जागतिकीकरणाला जसजशी गती प्राप्त होऊ लागली आणि अनेकानेक देश त्या प्रक्रियेत अपरिहार्यपणे सहभागी होऊ लागले तसतशी त्याच्या संभाव्य परिणामांची चर्चाही जगभरात जोर धरू लागली. त्याच्या जोडीने कुठे जागतिकीकरणाला होणारा विरोध एकेक पाऊल पुढे सरकू लागला. तर कुठे त्याचे समर्थन होऊ लागले. त्यामुळे चर्चांमध्ये सहभागी होणा-यांचे जागतिकीकरणाचे समर्थक व विरोधक असे दोन गट पडले. जागतिकीकरणाबाबत ठोस भूमिका न घेणारा पण काही मुद्यांबाबत जागतिकीकरणाचे समर्थन करणारा तर काही मुद्यांना विरोध करणारा असा एक गटही आढळू लागला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक देश परस्परांच्या जवळ येत गेले तसेच अनेक देशांमधील समर्थक व विरोधक गटही परस्परांच्या जवळ येत गेले. यातून जागतिकीकरणविरोधी चळवळ आकाराला आली. जागतिकीकरणाचे समर्थन व विरोध या दोन्हींना मोठ्या पातळीवर प्रसिद्धी मिळाली असली तरी सामान्यपणे विरोधाची बाजू अधिक आक्रमकतेने पुढे आली.

पाण्याचे अनेक छोटे प्रवाह एकत्र येऊन एक मोठा प्रवाह तयार व्हावा तसे काहीसे जागतिकीकरणविरोधी चळवळीबाबत घडले. एक मोठी चळवळ असे तिचे स्वरूप पुढे आले असले तरी प्रत्यक्षात तिच्यात अनेक छोट्या चळवळींचा मोठा सहभाग होता. म्हणजे, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वाढत्या वर्चस्वाला व अमर्याद सत्तेला विरोध करणारे, जागतिक पातळीवरील गरिबी दूर व्हावी असे वाटणारे, सातत्यपूर्ण विकासाच्या पर्यायाबाबत आग्रही असणारे, पृथ्वीच्या वाढत्या तापमानाची व पर्यावरणाची काळजी बाळगणारे, महिलांच्या संघटना बांधणारे, मानवी हक्कांचा पुरस्कार करणारे इत्यादी अनेकानेक गट जागतिकीकरण विरोधी चळवळीत सहभागी झालेले होते. जागतिकीकरणाला विरोध करणे हे एकप्रकारे त्यांच्या मूळ उद्दिष्टांशी सुसंगत असे पाऊल आहे, असे त्यांना वाटत होते, म्हणून असे अनेक गट एकत्र येऊन जागतिकीकरणविरोधी चळवळ - एक मोठा प्रवाह - तयार झाला.

**प्रारंभ चळवळीचा**

जागतिकीकरणविरोधी चळवळीबाबत एक लक्षात घेण्यासारखी बाब अशी की मुळात ही चळवळ जागतिकीकरणांतर्गत येणा-या काही मुद्यांना विरोध करण्यासाठी आहे, कोणत्याच बाबतीत जागतिकीकरण नको, अशी या चळवळीची ठाम भूमिका असतेच असे नाही. उदाहरणार्थ, जगात सर्वत्र न्याय प्रस्थापित व्हावा असे या चळवळीत सहभागी होणा-या अनेकानेक नागरिकांना वाटत असते. म्हणजे एका अर्थाने ती जागतिक न्याय चळवळ असते. त्यामुळे तिला जागतिकीकरणविरोधी या नावाने का संबोधले जाते असा प्रश्न उपस्थित होतो. असे असले तरी आज जागतिकीकरणविरोधी चळवळ असा शब्दप्रयोग रूढ झालेला आहे, हे खरेच. त्यामुळे येथेही तो रूढ अर्थाने उपयोगात आणला आहे.

आर्थिक जागतिकीकरण नेमके केव्हा सुरू झाले हे नेमकेपणाने सांगणे जसे अवघड व गुंतागुंतीचे आहे, त्याप्रमाणेच जागतिकीकरणविरोधी चळवळ नेमकी केव्हा चालू झाली हे सांगणेही कठीण आहे. १७७३ मध्ये झालेली 'बोस्टन टी पार्टी', १९३० मध्ये महात्मा गांधीजींनी केलेला 'मीठाचा सत्याग्रह' या घटना एकाप्रकारे जागतिकीकरणाला विरोध करणा-या होत्या, असे मत या संदर्भातील काही अभ्यासक मांडतात. पण सर्वसाधारणपणे १९८०च्या दशकात जागतिकीकरणविरोधी विचारधारा पुढे येऊ लागली असे म्हटले जाते. त्या पूर्वी १९७० ते १९८०च्या दशकात काही चळवळींनी मूळ धरले होते. त्यात स्त्री-वादी चळवळ, शांततेसाठी चळवळ, अलिप्त राष्ट्रांची चळवळ इत्यादींचा उल्लेख करता येईल. स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५मध्ये आयोजित केलेली पर्यावरणविषयक परिषद आणि ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथे स्थापन झालेले 'ग्रीन पक्ष' या घटनादेखील यादृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. दुस-या महायुद्धानंतर विविध देशांमधील नागरिकांनी जगाचे राजकारण, आर्थिक परिस्थिती, तंत्रज्ञान इत्यादींबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली होती. जागतिकीकरणविरोधी चळवळीच्या दृष्टीने इतिहासातील या घटनाही महत्त्वाच्या म्हटल्या पाहिजेत. मानवतावादाचे भवितव्य काय, हा प्रश्न त्या काळात देशोदेशींच्या नागरिकांच्या मनांत निर्माण होऊ लागला होता,.ही बाब येथे उल्लेखनीय ठरते. व्हिएतनाम युद्धाबाबत व्यक्त करण्यात आलेला निषेध, पॅरिस येथे विद्यार्थ्यांनी केलेली निदर्शने, १९७२मध्ये 'क्लब ऑफ रोम'ने प्रसिद्ध केलेले 'द लिमिट्स् टू ग्रोथ' हे प्रकाशन आणि १९७३ मध्ये शुमाकर यांचे 'स्मॉल इज ब्युटिफूल' ही प्रकाशने हे जागतिकीकरणविरोधी चळवळीच्या दृष्टीने

महत्त्वाची दस्तऐवज ठरली. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरलेले राचेल कार्सन यांचे 'सायलेन्ट स्प्रिंग' हे पुस्तकही याच प्रकारात मोडते.

१९७०च्या दशकात जागतिक राजकारणात डावा गट सक्रिय होता. काही प्रमाणात त्यांचा प्रभावही होता. पण सोव्हिएत रशियाचे विघटन, बर्लिनची भिंत पडून जर्मनीचे झालेले एकत्रीकरण इत्यादी घटनांमुळे डावी विचारसरणी मागे पडल्याचे दिसून येऊ लागले. या दरम्यान, चीनमधील साम्यवाद मात्र टिकून राहिला. पण चीनने परकीय गुंतवणुकीचा मार्ग खुला करण्याच्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली होती. १९७०-८०च्या दशकात व त्यानंतरच्या काळात स्त्री-वादी, पर्यावरणवादी, शांततावादी अशा काही चळवळी उभ्या राहिल्या. पण त्या डाव्याच होत्या असे नाही. कधी त्यांच्यावर डाव्यांचा प्रभाव पडला तर कधी नाही. काही चळवळी डाव्यांच्या प्रभावापासून दूरही होत्या. डाव्यांच्या अखत्यारित असलेल्या काही मुद्यांवर या संघटनांचा प्रभाव वाढला असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, कामगारांच्या हक्कांचे रक्षण, कामाच्या ठिकाणी त्यांना मिळणा-या सोयी-सुविधा वा त्यांचे होणारे शोषण हे विषय मानवाधिकार चळवळीसाठी महत्त्वाचे ठरू लागले. याचा अर्थ जागतिकीकरणविरोधी चळवळीत डाव्यांचा सहभाग नाही, असा नव्हे. पण एकेकाळी त्यांची एक विशिष्ट राजकीय विचारसरणी व तिचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येत होता, तशी राजकीय विचारसरणी व प्रभाव या चळवळींच्या काळात आढळत नाही.

### निदर्शनांचा काळ

जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या विरोधात १९८०च्या दशकात करण्यात आलेला निषेध ही जागतिकीकरणविरोधी चळवळीच्या दृष्टीने एक मोठी घटना ठरते. जागतिक बँकेच्या व नाणेनिधीच्या कारभारावर टीकेची झोड उठली ती इंडोनेशियातील सुहार्तो सरकारच्या कारकीर्दीतील 'ट्रान्समायग्रेशन' प्रकल्पामुळे तसेच भारतातील नर्मदाप्रकल्पामुळे. नर्मदा प्रकल्पातून अखेर जागतिक बँकेने अंग काढून घेतले. यानंतरच्या काळात विकसनशील राष्ट्रांमध्ये कर्जाचे संकट उभे ठाकले तेव्हा कर्जमाफीचा पर्याय पुढे आला. दरम्यान, या संस्थांच्या कारभारावर बरीच टीका करण्यात आली होती.

१९९०च्या दशकात जागतिकीकरणाने वेग घेतला. या काळात जागतिकीकरणविरोधी चळवळींचा जोर ओसरल्याचे दिसते. तरीदेखील १९९२मध्ये रिओ-दि-जानेरिओ येथे झालेल्या 'वसुंधरा परिषदे'मुळे काही प्रमाणात जागतिकीकरणाच्या विरोधात वातावरण होते. अर्थात, त्यामुळे जागतिक अर्थ-व्यापारविश्वात फारसा फरक

पडला नाही. उलट, जागतिक व्यापार वाढून जागतिकीकरणाला गती मिळावी यासाठी १९९५मध्ये जागतिक व्यापार संघटना स्थापन झाली. आर्थिकदृष्ट्या होणारे जागतिकीकरण सर्वांसाठीच उपयुक्त ठरेल, असे अनेकांना वाटत होते. याच काळात 'नॅशनल वाइल्डलाइफ फेडरेशन', 'द वर्ल्डवाइड फंड फॉर नेचर', 'एन्व्हायर्नमेंटल डिफेन्स फंड' अशा काही संस्था/संघटना अमेरिकेत स्थापन झाल्या. व्यापाराला चालना देणारे 'नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड अॅग्रीमेन्ट' (NAFTA) १ जानेवारी १९९४पासून लागू करण्यात आले. त्याला काहींनी पाठिंबा दिला, तर मेक्सिको येथील Zapatista National Liberation Armyने याला मोठा विरोध केला. मेक्सिकोमधील Chiapas या भागात आर्थिक जागतिकीकरणामुळे होणा-या संभाव्य परिणामांचा व गरिबीचा विचार या आंदोलनाच्या केंद्रस्थानी होता. मात्र, या विरोधामुळे अमेरिकेतील विविध संस्था/संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मेक्सिकोमधील या भागाला भेट दिली. जागतिकीकरणविरोधी चळवळींना या आंदोलनाने चांगलीच ऊर्जा पुरविली.

१९९०च्या दशकाच्या उत्तरार्धात, 'मल्टिलॅटरल अॅग्रीमेन्ट ऑन इन्व्हेस्टमेंट' (MAI) आणि जागतिक व्यापार संघटनेची सिएटल येथील वादग्रस्त ठरलेली चर्चेची दुसरी फेरी (डिसेंबर १९९९) यांमुळे जागतिकीकरणविरोधी चळवळीला पुन्हा जोम प्राप्त झाला. त्यातही, सिएटल येथे झालेला विरोध हा अभूतपूर्वच ठरला. जागतिकीकरणाच्या विरोधात तेथे सुमारे ५० हजार नागरिकांनी फार मोठ्या प्रमाणावर निदर्शने केली. त्या वेळी निदर्शक व पोलिस यांच्यात चकमक झडून निदर्शनकर्त्यांना पांगविण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराचा वापर करावा लागला होता. आर्थिक जागतिकीकरणाच्या विरोधात उमटलेल्या या नकारात्मक प्रतिक्रियेमुळे जागतिकीकरणातील एका नव्या विरोधी पर्वाची नांदी झाली. यानंतर वॉशिंग्टन येथे जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यात चर्चा झाली (एप्रिल २०००) तेव्हादेखील निदर्शनांचा जोर कायम होता. मेलबोर्न येथे आशियाई विकास बँकेच्या बैठकीच्या वेळी (मे २०००) तसेच प्राग येथे जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यातील चर्चेच्या वेळी (सप्टेंबर २००८) आणि क्युबेक येथे 'द अमेरिकाज्' परिषदेच्या वेळी (एप्रिल २००१) निदर्शने झाली. 'जी-आठ' गटाची बैठक इटलीत (जुलै २००१) झाली तेव्हा तर फारच मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली. या वेळी दोन ते तीन लाख नागरिक जागतिकीकरणाच्या विरोधात विविध घोषणा देत रस्त्यांवर उतरले होते. या नंतर ११ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवाद्यांनी अमेरिकेवर हल्ला केल्यानंतर जागतिकीकरणविरोधी

चळवळ थंडावेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. पण विरोधकांची ही विश्रांती थोड्या कालावधीचीच ठरली. वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, सिडने, जोहान्सबर्ग, मेक्सिको येथेही २००२ ते २००३ या काळात काही ना काही कारणाने निदर्शने झाली. पण निदर्शनांचा परिणाम तात्कालिक असतो, हे संबंधितांना हळूहळू जाणवू लागले. निदर्शने हा चळवळीचा एक मोठा व महत्त्वाचा भाग असला तरी निदर्शने म्हणजे 'वैचारिक बदल घडविणारी चळवळ' नव्हे, ही बाब सर्वांनी ध्यानात घेतली. त्यामुळे उद्दिष्टांपर्यंत पोहचण्यासाठी पर्यायी मार्गांचा अवलंब करण्याचे प्रयत्न चालू झाले.

**धोरणात्मक दिशेकडे...**

जागतिकीकरणाला विरोध करण्यासाठी पर्यायी मार्गांचा विचार चालू झाला तेव्हा सर्वप्रथम धोरणविषयक चर्चा पुढे आली. अशी चर्चा अधिकाधिक देशांमधील अनेक नागरिकांपर्यंत पोहचावी व त्यांनाही यात सहभागी होता यावे यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली. कारण, इंटरनेटमुळे माहितीयुग चालू झाले होते आणि जगाच्या कानाकोप-यात संपर्क साधता येऊ लागला होता. त्यामुळे २००२-०३ नंतरच्या काळात जागतिकीकरणाशी संबंधित विविध मुद्यांचा ऊहापोह करणा-या भरपूर वेबसाइट्स् आपला जम बसवू लागल्या. त्यात अनेक संस्थांचाही समावेश होता. या संस्थांमध्ये Ralph Nader's Public Citizen (USA), New Economics Foundation (UK), Third World Network (Malaysia), Focus on the Global South (Thiland) इत्यादींचा उल्लेख करता येईल. याशिवाय The Transnational Institute, GATSwatch, Corporations Watch, Multinational Monitor इत्यादींच्या वेबसाइट्सही महत्त्व मिळवून आहेत.

याशिवाय, जागतिकीकरणाशी संबंधित विविध धोरणांवर आपला दबाव असावा या दृष्टीने काही मंच स्थापन करण्यात आले. New Economics Foundation आणि International Forum on Globalization यांची स्थापना या उद्दिष्टाने झाली. दरम्यान, जागतिकीकरणाशी संबंधित असलेल्या अनेकानेक चळवळींमध्ये एकी असावी, या व्यापक उद्दिष्टाने Foundation for Ethics and Meaningया मंचाची स्थापना न्यूयॉर्क येथे २०००मध्ये करण्यात आली होती. जागतिकीकरणाचे विविध आयाम व विविध देशांमधील विविध गटांची भूमिका समजून घेऊन सर्वांना एकत्र आणण्यासाठी 'वर्ल्ड सोशल फोरम'ने मोठी भूमिका बजावली. २००१ ते २००३ या काळात 'वर्ल्ड सोशल फोरम'ने जगभरातील ५०हजार ते एक लाख नागरिकांना

एकत्र आणले होते. यानंतर 'मिडल ईस्ट सोशल फोरम', 'आफ्रिकन सोशल फोरम', 'पॅन अमेझोनियन सोशल फोरम', 'युरोपियन सोशल फोरम', 'इंडियन सोशल फोरम' इत्यादींची स्थापना झाली.

चालू शतकात स्थापन झालेल्या स्वयंसेवी संस्थांमधील बहुसंख्य संस्था या सर्व प्रक्रियेचा एक भाग होय. विशेषतः, सिएटल येथील घटनेनंतर अनेक स्वयंसेवी संस्थांनी या संदर्भात बरेच कार्य केले. स्वयंसेवी संस्थांसारखी भूमिका घेऊन काही नवे राजकीय पक्षदेखील यात उतरले. यांत पर्यावरणविषयक संस्था, संशोधनकार्य करणा-या संस्था, कर्जमाफीत पुढाकार घेणा-या संस्था, विकासविषयक कार्य करणा-या संस्था आणि विविध प्रकारे मदतकार्य करणा-या संस्था इत्यादींचा समावेश होतो. जागतिकीकरणविरोधी चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांना स्वयंसेवी संस्थांची वा राजकीय पक्षांची सर्व बाबतीतील भूमिका पटली होती, असे नाही. पण जागतिकीकरणविरोधी चळवळीतील व प्रसारमाध्यमांतील विधानांमध्ये या स्वयंसेवी संस्था वा पक्ष यांचा प्रभाव आढळत होता (उदाहरणार्थ - नर्मदा आंदोलन).

आता जागतिकीकरणविरोधी चळवळींना अनेक नावे मिळाली आहेत. नागरी समाजाची चळवळ (सिव्हिल सोसायटी मुव्हमेन्ट), भांडवलशाहीविरोधी चळवळ, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विरोधातील चळवळ, जागतिक सामाजिक न्याय चळवळ अशा विविध नावांनी कार्य करणा-या चळवळींत जागतिकीकरणासंबंधीच्या विविध मुद्यांबाबत एकवाक्यता आहे असे नाही आणि तशी एकवाक्यता येणेही अवघडच आहे. तसेच या चळवळींचे विरोधक नेमके कोणकोण आहेत याबाबतही एकमत झालेले दिसत नाही. काही चळवळींचा विरोध भांडवलशाहीच्या धोरणांना, काहींचा विरोध बहुराष्ट्रीय कंपन्यांना तर काहींचा विरोध खुल्या व्यापाराला आहे. पण तशी एकवाक्यता नसली तरी आज अनेक संघटना आपापल्या क्षेत्रात कार्य करीत आहेत, सरकारांबरोबर चर्चा करीत आहेत. कधी धोरणे आखण्यात सहभागी होत आहेत. उदाहरणार्थ, जागतिक आरोग्य, पर्यावरण, शहरांचे नियोजन, शहरीकरणामुळे होणारे स्थलांतर, स्थानिकांचे अधिकार अशा अनेक मुद्यांवर आज विविध संघटना कार्य करीत आहेत. स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा तीन वेगळ्या पातळ्यांवर हे कार्य चालू आहे. मतमतांतराच्या गलबल्यात कोणत्या ना कोणत्या नावाने जागतिकीकरणविरोधी चळवळ टिकून राहील असा अंदाज मांडता येतो. पण त्यामुळे जागतिक अर्थकारणावर कसकसे परिणाम घडून येतील, हे आता नेमकेपणाने स्पष्ट होणे अवघड आहे. ■■

# रुचकर जागतिकीकरण 'पूर्णब्रह्मा'चे !

'अन्न हे पूर्णब्रह्म' ही, पहिला घास मुखामध्ये घालण्यापूर्वी करावयाच्या प्रार्थनेची केवळ एक ओळ नाही. या तीन शब्दांत अवघ्या ब्रह्मांडाला व्यापणा-या एका संस्कृतीची आत्मखूण सामावलेली आहे. उभ्या जीवनसृष्टीचा आधार असणा-या अन्नालाच ब्रह्मत्व बहाल करणारी ही संस्कृती जगाच्या कानाकोप-यात मानवी सृष्टीच्या पहिल्या श्वासापासून नांदते आहे. धर्म, भाषा, जातपात, देश, काल, लिंग, पंथ या सारख्या तुम्हीआम्ही निर्माण क्षुद्र भिंतींना ओलांडून जाणारी अन्नाबाबतची ही भावना एका शाश्वत सत्याकडे निर्देश करते. अन्न हा आमच्या संपूर्ण जगण्याचा पायाच आहे, हे ते सत्य. या पायावरच मानवी संबंधांची, संस्कृतीची इमारत उठवलेली आहे. त्यामुळे, या पायामध्येच मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडून येऊ लागले तर त्यावर तोललेल्या संस्कृतिरूपी इमारतीमध्येही तसेच बदल व्हावेत, हे साहजिकच ठरते.

अत्यंत प्रगत असे दळणवळण तंत्रशास्त्र आणि माहिती संकलन व संकलित माहितीच्या वेगवान आदानप्रदानाचे तंत्रज्ञान यांचे अद्यावतीकरण या दोन सुधारणांनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावलेली आहे. जगाचे रूपांतर विशाल अशा खेड्यामध्ये घडवून आणण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली, ती या दोन गोष्टींमुळे. या दोन बाबींच्याच माध्यमातून संस्कृतींच्या अभिसरणास वेग आला. त्यातून आता बहुसांस्कृतिकतेचा पैलू जोमदारपणे पुढे येतो आहे. आमची राहणीसाहणी, वेष, भाषा, विचारपद्धती, करमणुकीची साधने व विषय या सगळ्यांतच संस्कृतींच्या या सरमिसळीचे प्रतिबिंब पडू लागले आहे. याचा एक परिणाम म्हणजे, संपूर्ण जगच आज एका मजेशीर भावनिक कात्रीतून पुढे सरकते आहे. जगभरच्या संस्कृतींच्या एकत्र येण्यातून निर्माण होत असलेल्या एका विशाल सांस्कृतिक प्रवाहाचा घटक तर बनायचे, मात्र, त्या प्रवाहाशी समरस होत असतानाच आपल्या संस्कृतीचेही पृथकपण जपायचे, अशी ही विलक्षण कसरत आहे. या सा-या देवाणघेवाणीतून, एका सबगोलंकार जागतिक संस्कृतीचे आकाराला येणे अजूनही कित्येकांना रुचणे अवघड जात असल्याने अनेकानेक ताणतणावही निर्माण होत आहेत आणि पुढेही होतच राहतील.

परंतु, संस्कृतीच्या एका अंगाला व्यापून उरलेले जागतिकीकरण मात्र शब्दशः 'रुचकर' असल्याने ते सगळ्यांच्याच विनातक्रार 'पचनी' पडलेले आहे. हे जागतिकीकरण आहे पूर्णब्रह्म म्हणून गणल्या गेलेल्या अन्नब्रह्माचे ! या जागतिकीकरणाला काही

कोणाचा टोकाचा विरोध वगैरे असल्याचे दिसत नाही. आमच्या ताटात पडणारा अमुक पदार्थ 'स्थानिक' आणि तमूक पदार्थ मात्र 'उपरा' वा 'परका' असा आवाज उठविणा-या कोणत्याही 'सेना' दृष्टोत्पत्तीस पडत नाहीत. उदरात उतरलेल्या अन्नब्रह्माच्या ठायी असणारी रसवत्ता आणि तिच्याद्वारे मिळणारा (अन्न)ब्रह्मानंद ते अन्न, त्याच्या निर्मितीमध्ये वापरले गेलेले घटकपदार्थ आणि अन्न शिजवणा-याच्या प्रादेशिकतेचा मुद्दा अप्रस्तुतच ठरवतो. प्रादेशिकतेवर रसवत्ता मात करते, हा अनुभव सर्व जगभरच येतो. कारण, क्षुधाशांतीच अखेर सर्वांत महत्त्वाची नाही का ! शेतमालाचा विक्रीव्यापार, प्रक्रियायुक्त शेतीजन्य जिनसांचे वितरण करणा-या ज्या बहुराष्ट्रीय कंपन्या जगाच्या अन्नसाखळीत मोलाची भूमिका बजावताना आज दिसतात, त्यांचा पूर्णब्रह्माच्या या जागतिकीकरणात (की ब्रह्मांडीकरणात ?) अतिशय मोलाचा सहभाग आहे. जागतिक स्तरावरची एक बहुविध खाद्यसंस्कृती यातून स्थिरावते आहे. पिठलेभात चापणे पिढ्यान्‌पिढ्या अंगवळणी मुरलेल्या कुटुंबांमध्येही, अधूनमधून का होईना पण, नवीन पिढीच्या जोडीनेच जुनी पिढीही 'डॉमिनोज्'चा पिझ्झा चाखून बघताना आज दिसते, हे या नवीन जागतिक अन्नसंस्कृतीचे जणू प्रातिनिधिक चित्रच !

'प्रोसेस्ड्' आणि 'ब्रॅन्डेड' खाद्यपदार्थांचा आमच्या जीवनातील प्रवेश सर्वसंचारी आणि सहज बनण्यास या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जगड्व्याळ व्याप कारणभूत आहे. हे पदार्थ आमच्या खाद्यसंस्कृतीशी आताशा इतके समरस होत आहेत की, आपण आस्वाद घेत असलेल्या पदार्थातील मूळ घटक कोठे निर्माण झाले आहेत अशासारख्या खाद्येतर बाबीचा आपल्या विचारविश्वात मुळीसुद्धा प्रवेशच होत नाही. अन्नब्रह्माच्या या अशा जागतिकीकरणाने आमच्या केवळ खाद्यजीवनावरच आपली मुद्रा उमटविली आहे, असे नाही तर, आमच्या भाषाविश्वातही त्याने एक आस्वाद्य भर घातली आहे. 'फूड माइल्स्' ही नवीनच शब्दयोजना आजच्या जागतिक अन्नव्यवस्थेत स्थिरावते आहे. शेतामध्ये राबणा-या हातांनी पिकवलेले धान्य अन्नरूपाने ताटात वाढले जाइपर्यंत किती मैलांचा टप्पा पार करते, याचे मोजमाप म्हणजे 'फूड माइल्स्'. आजमितीस, अमेरिका वा कॅनडासारख्या देशात कोणत्याही सरासरी अन्नघटकाचा हा प्रवास किमान दोन ते अडीच हजार मैलांचा असतो ! शेतीमध्ये धान्यधुन्य पिकविण्यासाठी वापरल्या जाणा-या खतासारख्या साधनसामग्रीचा, खतांच्या निर्मितीसाठी वापरल्या गेलेल्या कच्च्या मालाचा (उदाहरणार्थ, खनिज तेल) प्रवास या हिशेबात धरला तर या अंतराची गणती किती वाढेल याचा केवळ अंदाज केला तरी पुरे !! ■■

## प्रमुख संदर्भ

(1) Free Trade: Myth, Reality And Alternatives, Graham Dunkley, Books for Change, Banglore, 2004.
(2) Globalization : Tame it or Scrap It ?, Greg Buckman, Books for Change, Banglore, 2004.
(3) Fair Future: Resource Conflicts, Security and Global Justice, (Ed.) Wolfgang Sachs and Tilman Santarius, Zed Books Ltd, London, 2007.
(4) The Global Food Economy : The Battle For the Future of Farming, Tony Weis, Zed Books Ltd, London, 2007
(5) Globalization of Food and Agriculture And the Poor, (Ed.) Joachim von Braun and Eugenio Diaz-Bonilla, Oxford University Press, 2008
(6) Liberalization And Development, Deepak Nayyar, Oxford University Press, 2008

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी ाषेला अिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. -. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ — किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणा-यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## ‘अर्थबोधपत्रिका’ वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व ‘अर्थबोधपत्रिके’चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

## ग्रंथालयातील नवी पुस्तके

**■ The Global Food Economy : The Battle For the Future of Farming, Tony Weis, Zed Books Ltd, London, 2007, PP. 217, Price - Rs. 300/-**

जगभरातीलच शेतीक्षेत्रात दुस-या महायुद्धानंतरच्या काळात अभूतपूर्व आणि अतिशय मूलभूत स्वरूपाचे बदल घडून आले. शेती कसण्याच्या तंत्रात आणि त्याचप्रमाणे शेतीच्या व्यवस्थापनात प्रगत ज्ञान-विज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर घडून आल्याने या क्षेत्रातील उत्पादनप्रक्रियेचा तोंडवळा पार बदलून गेला आहे. त्याच वेळी, शेतमालाचा व्यापार आणि वितरणाच्या संस्थात्मक यंत्रणेतही जागतिक पातळीवरच मोठे बदल घडून आले. या सगळ्या घडामोडींमुळे, उभ्या जगातील शेती व्यवसाय आजमितीस स्थित्यंतराच्या पर्वातून मार्गक्रमण करीत आहे. यातून जागतिक अन्नव्यवस्थेशी संलग्न अशा अनेकविध समस्या आणि विरोधाभासांचे एक मोठे मोहोळच जणू तयार झाले आहे. या समस्यांची गुंतागुंत समजावून घेण्याचा प्रयत्न करणे आणि त्याच वेळी जागतिक स्तरावरील उद्याच्या अन्नविषयक अर्थव्यवस्थेचा वेध घेणे, हा प्रस्तुत ग्रंथाचा केंद्रबिंदू आहे. विशेषतः, जागतिक व्यापार संघटनेच्या १९९५ साली झालेल्या स्थापनेनंतर तर शेतमालाच्या व्यापाराला एक नवीनच परिमाण चिकटले. याचेच एक अंग म्हणजे जगभरातच शेतमालाच्या व्यापारात बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका व सहभाग बलवत्तर ठरतो आहे. त्यातच, शेतीच्या संदर्भातील करारामुळे (ॲग्रिमेन्ट ऑन ॲग्रिकल्चर) वादवादंगांच्या धुरळ्याचे एक नवीनच उपपर्व गाजू लागले आहे. त्या वादळापायी जागतिक व्यापार संघटनेच्या सिॲटल, कॅनकन आणि दोहा येथील परिषदा झाकोळून गेल्याचे आपण अनुभवले. या सगळ्या घुसळणीचे देशोदेशीच्या शेतीवर आणि त्यातही पुन्हा लहान शेतक-यांवर होणारे परिणाम वेगवेगळे आहेत. देशादेशात पसरत असलेल्या नागरीकरणामुळे जमिनीचा वापर, अन्नधान्याची मागणी, रोजगार, सर्वसामान्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, आहारविषयक संकल्पना व अपेक्षा यांत सतत नवनवीन बदल घडून येत आहेत. अशा सगळ्याच बदलत्या प्रवाहांचे एकूण जगाच्याच अन्नसुरक्षेवर संभवणारे परिणाम उलगडून वाचकांसमोर मांडणारा हा ग्रंथ जागतिकीकरण आणि संलग्न विषयांच्या अभ्यासक-संशोधकांप्रमाणेच सर्वसामान्य वाचकांनाही नक्कीच रोचक वाटेल. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •एस. श्रीरामन •जया सागडे •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**